# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**<u>दिनांक १६ जुलै २००९ (का.प.क्र.२७) रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त.</u>**

गुरूवार दिं.१६/०७/२००९ रोजी मा.महापौर सौ.विजया किशोर रहाटकर यांचे अध्यक्षतेखाली महापालिकेची सर्वसाधारण सभा महापालिकेच्या मुख्य कार्यालयातील प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह येथे दु.१२.४५ वा.वंदेमातरम या गिताने सुरू झाली सभेला मा.आयुक्त डॉ.पुरूषोत्तम भापकर भा.प्र.से.,नगरसचिव श्री.एम.ए.पठाण तसेच संबंधीत अधिकारी व खालीलप्रमाणे पालिका सदस्य उपस्थित होते.

०१. स.स.श्री.भाऊसाहेब बाबुराव वाघ
०२. स.स.श्री.अब्दुल साजेद अब्दुल सत्तार
०३. स.स.श्री.गजानन रामकिशन बारवाल
०४. स.स.श्री.संजय उत्तमराव जगताप
०५. स.स.श्री.बमने पुनमचंद सोनाजी
०६. स.स.श्री.सुरे सीताराम इसराम
०७. स.स.श्री.ताठे भाऊसाहेब पुंडलिक
०८. स.स.श्री.गवळी रविकांत काशिनाथ
०९. स.स.श्री.नाहदी नासेर महमंद याहीया
१०. स.स.श्री.पांडे विनायक प्रभाकर
११. स.स.श्री.दाभाडे मिलिंद यशवंत
१२. स.स.श्री.धिल्लन तरवेंद्रसिंग महेंद्रसिंग
१३. स.स.श्री.जेम्स अंबिलढगे
१४. स.स.सौ.विजयाताई बनकर
१५. स.स.श्री.मेघावाले मोहन धन्नुलाल
१६. स.स.सौ.रजनी रमेश जोशी
१७. स.स.श्री.माळवतकर महेश शिवाजीराव
१८. स.स.श्री.अत्तरदे प्रकाश सुका
१९. स.स.श्री.जैस्वाल अनिल जुगललाल
२०. स.स.सौ.सुशिला भगवान रगडे
२१. स.स.श्रीमती मिराताई रामराव शिंदे
२२. स.स.श्री.काशिनाथ हरीभाऊ कोकाटे
२३. स.स.श्रीमती खान मेहरून्निसा खान हमीद
२४. स.स.सौ.मिटकर शोभा हरिश्चंद्र
२५. स.स.श्रीमती यास्मीन बेगम अ.कदीर
२६. स.स.श्री.स.खुसरो बुऱ्हानोद्दीन
२७. स.स.श्री.अ.रशिद खान (मामु) हमीद खान
२८. स.स.श्रीमती लता श्रीनिवास दलाल
२९. स.स.श्री.पाटील नरवडे वसंत पांडूरंग
३०. स.स.श्री.संजु रिडलॉन

३१. स.स.सौ.सिध्द वीणा गजेंद्र
३२. स.स.श्रीमती कुरैशी नजमा बेगम युनूस
३३. स.स.श्री.खान हाजी शेरखान अ.रहेमान
३४. स.स.सौ.राऊत छाया विलास
३५. स.स.श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर
३६. स.स.श्री.अशोक गोरखनाथ विरकर
३७. स.स.श्री.देसरडा प्रशांत सुभाष
३८. स.स.श्री.गायकवाड कैलास लक्ष्मण
३९. स.स.श्री.अमोदी अबुबकर बिन सईद
४०. स.स.श्रीमती शेख शमशाद बेगम शेख हफिज
४१. स.स.श्री.संतोष सुधाकरराव जेजुरकर
४२. स.स.श्री.त्र्यबंक तुपे
४३. स.स.सौ.पोळ सरला सखाराम
४४. स.स.श्री.कटकटे सतिष विश्वनाथ
४५. स.स.श्रीमती बोरामणीकर कला सुरेश
४६. स.स.श्री.डॉ.कराड भागवत किसनराव
४७. स.स.सौ.मंगला प्रकाश गायकवाड
४८. स.स.श्री.रेणुकादास दत्तोपंत वैद्य
४९. स.स.श्रीमती रेखा कैलास काथार
५०. स.स.श्री.गांगे रविंद्र लक्ष्मण
५१. स.स.श्रीमती पाटणी हर्षमाला विजयकुमार
५२. स.स.श्रीमती डॉ.आशा उत्तमराव बिनवडे
५३. स.स.श्री.खुडे विजय किसन
५४. स.स.श्रीमती जयश्री सारंग किवळेकर
५५. स.स.श्री.दामोधर माधवराव शिंदे
५६. स.स.श्री.गांगवे बन्सीलाल तुळशीराम
५७. स.स.श्रीमती सरिता अशोक ससाणे
५८. स.स.श्री.भगवान (बापु) देविदासराव घडमोडे
५९. स.स.श्री.रवि साहेबराव कावडे
६०. स.स.श्री.डांगे बाबासाहेब लक्ष्मण
६१. स.स.श्री.कुचे नारायण तिलोकचंद
६२. स.स.सौ.शिंदे पुष्पा बाळु
६३. स.स.सौ.वाघमारे पार्वताबाई विजय
६४. स.स.श्री.विसपुते शशांक दामोधर
६५. स.स.श्री.निमगांवकर प्रल्हाद गणपतराव
६६. स.स.सौ.खंदारे वंदना प्रकाश
६७. स.स.सौ.कोंडेकर अंजली दिलीप
६८. स.स.श्री.जोशी संजय रामदास
६९. स.स.श्री.दाभाडे हिम्मतराव साळुबा
७०. स.स.श्री.मोरे कचरू विश्वनाथ
७१. स.स.श्री.संजय पांडूरंग शिरसाट

७२. स.स.श्रीमती अल्पा विकास जैन
७३. स.स.श्रीमती मोमीन सफिया फिरदोस अय्युब खान
७४. स.स.श्रीमती अनिता नंदकुमार घोडेले
७५. स.स.श्री.विनोद सोनवणे

**नामनिर्देशित पालिका सदस्य**

०१. स.स.श्री.संजय किसनराव केनेकर
०२. स.स.श्री.किशोर तुलशीबागवाले
०३. स.स.श्री.राजेश (पप्पु) व्यास
०४. स.स.श्री.सुरजितसिंग सबरवाल
०५. स.स.श्री.सुरेंद्र कुलकर्णी

**चर्चा :**

श्री.गजानन बारवाल : महाराष्ट्रातील नामाकिंत कलाकार व जेष्ठ अभिनेते स्व.निळु फुले यांचे दुःखद निधन झालेले आहे सभागृहातर्फे दोन मिनिटे त्यांना श्रध्दाजंली अर्पण करावी.

सौ.लता दलाल :महापालिकेचे माजी सभापती श्री.हाळनोर यांचे मातोश्री स्व.हरणाबाई नानाराव हळनोर यांचे दुःखद निधन झाले,त्यांनाही श्रध्दाजंली अर्पण करावी.

श्री.भगवान घडमोडे : स.सदस्य श्री.पुनमचंद बमने यांचे वडील स्व.सोनाजी बमने यांचे दुःखद निधन झाले त्यांनाही श्रध्दाजंली अर्पण करावी.

श्री.देसरडा प्रशांत :शहरात ज्या विविध घटनामध्ये मृत्यू झालेल्यांनाही श्रध्दाजंली अर्पण करावी.

श्री.अ.साजेद अ.सत्तार, श्री.संतोष जेजूरकर : यास माझे अनुमोदन आहे.

मा.महापौर : सर्वांनी श्रध्दाजंली अर्पण करण्यासाठी उभे रहावे.

याचवेळी स्व.निळू फुले,स्व.सोनाजी बमने तसेच स्व.हरणाबाई नानाराव हळनोर व शहरातील विविध घटनामध्ये एकूण ५ लोकांचा मृत्यू झाला यासर्वांना सभागृहातर्फे ०२ मिनिटे स्तब्ध उभे राहुन श्रध्दाजंली अर्पण करण्यात आली.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर : या महापालिकेला नवीन आयुक्त लाभलेले त्यांचे सभागृहाच्या वतीने स्वागत करावे. तसेच त्यांनी या महापालिकेत सलग ३ वर्ष राहून चांगली सेवा दयावी अशी अपेक्षा ठेवू त्यांना सर्वाचे सहकार्य मिळेल.

श्री.संजय जोशी : दोन वेळा महापौर राहिलेले डॉ.भागवत कराड यांचा आज वाढदिवस आहे, त्यांनाही शुभेच्छा देण्यात याव्या

श्री.रेणुकादास वैद्य : स.स.श्री.रविंद्र गांगे यांचा आज वाढदिवस आहे, त्यांनाही शुभेच्छा देण्यात याव्या.

श्री.गजानन बारवाल : मा.महापौर याची सुध्दा अखिल भारतीय महापौर परिषदेच्या उपाध्यक्षपदी निवड झाल्याबध्दल अभिनंदन.

सौ.लता दलाल : महापालिकेचे नवीन आयुक्त म्हणून डॉ.श्री.पुरूषोत्तम भापकर हे नुकतेच रूजू झालेले आहे त्यांनी अमरावती येथे जिल्हाधिकारी पदावर चांगले कामकेले,परवाच बघीतले आयुक्त हे साफसफाई कामगारांच्या बरोबर स्वतः झाडू घेवून साफसफाई करीत होते. म्हणजे निश्चितपणे

आम्हास एक आशावाद निर्माण झालाकी,नवीन आयुक्त येथे निश्चितच शहराच्या एकूण जडणघडणीत महत्वाची भुमिका बजावतील परंतु ती बजावण्यासाठी त्यांनी सतत ३ वर्ष येथे रहावे अशी सभागृहाच्या वतीने विनंती करते व शासनाला तशी सभागृहाच्या वतीने विनंती करावी अशी अपेक्षा करते.त्यांचे सभागृहात सभागृहाच्या वतीने हार्दीक अभिनंदन व स्वागत करते. तसेच मा.महापौर यांची अखिल भारतीय महापौर परीषदेच्या उपाध्यक्षपदी निवड झाल्याबध्दल सभागृहाच्या वतीने हार्दीक अभिनंदन करते. तसेच डॉ.भागवत कराड व स.सदस्य श्री.रविंद्र गांगे यांचे वाढदिवसानिमित्त त्यांचे मनपुर्वक हार्दीक अभिनंदन करते.

डॉ.भागवत कराड :नवनियुक्त मा.आयुक्त यांचे सभागृहातर्फे स्वागत करतो.त्यानी सलग ३ वर्ष येथे सेवा करावी अशी सर्वाचीच भावना आहे.मा.आयुक्त यांनी लगेचच कामामध्ये इन्ट्रेस दाखवला जे दुर्लक्षीत काम होते ते त्यांनी प्रथमतः हाती घेतलेले आहे.ही महापालिका आपली आहे असे समजून येणारे आयुक्त यांना सर्वांनी सहकार्य करण्याची. त्यांचेकडून चांगले काम करून घेण्याची गरज आहे.तसे वातावरण निर्माण करावे अशी अपेक्षा बाळगतो.

मा.महापौर :सभागृहाच्या भावना लक्षात घेवून नवीन आयुक्त डॉ.पुरूषोत्तम भापकर यांचे सभागृहाच्या वतीने स्वागत करते. नगरसचिव यांनी नवीन आयुक्त यांचा परिचय करून दयावा.

नगर सचिव : औरंगाबाद महानगरपालिकेचे आयुक्त म्हणून रूजू झालेले डॉ.पुरूषोत्तम निवृत्ती भापकर भरतीय प्रशासन सेवा १९९७ त्यांची जन्मतारीख दिं.२-५-१९५९ मुळ गाव मु.सालवडगांव पो. खरडगांव ता. शेवगांव जिल्हा अहमदनगर,शैक्षणिक पात्रता एम.ए.अर्थशास्त्र, एल.एल.बी.,पीएचडी (कृषि अर्थशास्त्र)त्यांनी पुढील प्रमाणे प्रशासकीय सेवा केली त्यात परिविक्षाधीन,उपजिल्हाधिकारी,जळगाव सन१९८४-१९८६, उपजिल्हाधिकारी रोहयो, धुळे सन १९८६-१९८७, उपविभागीय अधिकारी, निफाड नाशिक सन १९८८-८९,उपविभागीय अधिकारी, मालेगांव नाशिक सन १९८९-९२, निवासी उपजिल्हाधिकारी, धुळे सन १९९३-९५, उप संचालक, सैनिक कल्याण विभाग पूणे सन १९९५-९७,उपआयुक्त पूनर्वसन पूणे विभाग पूणे सन १९९७-९९,कुलसचिव, महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहूरी अहमदनगर सन १९९९-२००२,उपायुक्त महसूल नाशिक विभाग नाशिक सन २००२-०४,मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. परभणी सन २००४-०५,मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प.धुळे सन २००५-०६, मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. पुणे सन २००६-०७ जिल्हाधिकारी अमरावती दिं.२१-५-०७ ते ६-७-२००९ व आयुक्त महानगरपालिका औरंगाबाद येथे दिं.१०-७-२००९ रोजी कार्यभार स्विकारला आहे.मा.आयुक्त यांना अनेक पुरस्कार प्राप्त झालेले आहे त्यातील जनगणनेचे काम उत्कृष्ठरित्या केल्याबध्दल राष्ट्रपती सिल्वर मॅडल १९९१ जनगणना संदर्भात राष्ट्रपती सिल्वर मेडल, उत्कृष्ठ कामाबाबत महाराष्ट्र शासनाकडून सन २००२-०३ मध्ये

सन्मानित करण्यात आले सर्वोत्कृष्ठ अतिरिक्त जिल्हाधिकारी म्हणून शासनाचा पुरस्कार मिळालेला आहे.परभणी येथे शैक्षणिक षटकार एक नवा संकल्प हा शैक्षणिक कार्यक्रम राबवून शिक्षणांचे गुणवत्तेमध्ये अमुलाग्र बदल घडवून आणण्याचा प्रयत्न केल्याबध्दल २००५ मध्ये भारत ज्योती अवार्ड हा राष्ट्रीय स्तरावरील इंडिया इन्टरनॅशनल फॅड्रीशिफ सोसायटी नवी दिल्ली यानी बहाल केलेला अवार्ड आहे , मागासवर्ग व अल्पसंख्याक घटकातील मुलांसाठी शैक्षणिक गुणवत्ता विकास कार्यक्रम अंतर्गत शैक्षणिक षटकात एक नवा संकल्प या कार्यक्रमाद्वारे गुणवत्तेमध्ये अमुलाग्र बदल घडवून आणला त्याबध्दल सन २००६ मध्ये विहित एकलव्य राष्ट्रीय पुरस्कार तसेच २००७ मध्ये राज्य स्तरीय प्रशासन रत्न पुरस्कार अण्णाभाऊ साठे प्रतिष्ठाण यांचे मार्फत, पुणे जि.प. येथे मुख्य कार्यकारी अधिकारी असतांना गुणवत्ता विकास कार्यक्रम कुपोषण निर्मुलन बचत गट स्थापना महिलाचे सबळीकरण ईत्यादी कार्यक्रमांत उल्लेखनिय काम केल्याबध्दल सन २००७ मध्ये डॉ.मनीभाई देसाई राष्ट्रीय सेवा पुरस्कार डॉ. मनीभाई देसाई प्रतिष्ठाण उरळी कांचन पुणे यांचे मार्फत,महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोग मार्फत शांतता व राष्ट्रीय एकात्मता निर्माण करणे कामी दिलेल्या अति उत्कृष्ठ योगदान सन २००७-०८चा पुरस्कार, सन २००८ चा महात्मा गांधी शांतता पुरस्कार मिळालेला आहे.कार्यकुशलता लोकाभिमुख कुशल प्रशासन शैक्षणिक क्षेत्रातील संवेदनशिल योगदानाकरीता २००८ चा पुरस्कार मिळालेला आहे.राज्य स्तरीय जाणीव पुरस्कार जाणिव सांस्कृतिक अभियांन अहमदनगर मार्फत.आणि विविध सामाजिक सांस्कृतिक शैक्षणिक क्षेत्रातील योगदाना करीता सन २००८ चा पुरस्कार, राज्यस्तरीय मल्हार रत्न पुरस्कार मल्हार क्रांती संघटना अमरावती असे अनेक पुरस्काराने सन्मानित मा.आयुक्त या महापालिकेला लाभलेले आहे.

मा.महापौर	: वजनदार व चांगला बायोडाटा आलेल्या आयुक्तांचा आहे.अनेक पुरस्काराने ते सन्मानित आहे असे आयुक्त लाभलेले आहे ही आपल्या सर्वाकरीता आनंदाची गोष्ट आहे सभागृहाच्या वतीने मी आयुक्त डॉ.पुरूषोत्तम भापकर यांचे स्वागत करते.तसेच डॉ. भागवत कराड व स.स.श्री.रविंद्र गांगे यांचाही वाढदिवसानिमित्ताने त्यांचे सभागृहाच्या वतीने स्वागत करते.तसेच अखिल भारतीय महापौर परिषदेच्या उपाध्यपदी माझी निवड झाल्याबध्दल केलेल्या अभिनंदनाबध्दल मी सर्वांचे धन्यवाद करते.

मा.महापौर	:या निमित्ताने एकच सांगावेसे वाटते की अखिल भारतीय महाराष्ट्र महापौर परिषदेचे उपाध्यक्ष व महाराष्ट्र महापौर परिषदेच्या अध्यक्ष म्हणून जबाबदारी माझेकडे आहे सभागृहात काम करतांना नगरसेवकांच्या वेगवेगळया समस्या असतात अनेक अडचणी येतात शासनाकडे पाठपुरावा करवा लागतो महाराष्ट्रामध्ये पहिल्यांदा हे पद आलेले आहे ज्या स.सदस्यांच्या अडचणी असतील त्या सोडविण्याचा मी माझ्या परीने प्रयत्न करेल.

(याच वेळी मा.आयुक्त यांचे मा.महापौर यांनी पुष्पगुच्छ देवून स्वागत केले तसेच डॉ.भागवत कराड,श्री.रविंद्र गांगे यांचेही वाढदिवसानिमित्ताने स्वागत करण्यात येते.)

मा.आयुक्त :आपला सर्वांचा आभारी आहे की आपण माझे स्वागत केले.माझे विषयी चांगले शब्द काढले अजून कामाला फारशी सुरूवात झाली नाही आज कामाचा ४ था दिवस आहे. ज्या अपेक्षा आपण केल्या जे चांगल बोललांत त्याचे निश्चितच भान मी ठेवील आणि या महापालिकेला जमेल तेवढे चांगले काम करण्याचा आपल्या सहकार्यानेच प्रयत्न केले जाईल व सामान्य नागरीकांना चांगल्या सुविधा देण्यासाठी व आणखी पुढे कसे जाता येईल यासाठी हे प्राप्त करून घेण्यासाठी अहोरात्र प्रयत्नशील राहिल आपण मला दिलेल्या सुभेच्छा आहेत त्यांचे भान निश्चित ठेवील, धन्यवाद.

श्री.काशिनाथ कोकाटे : सन २००९-१० चा अर्थसंकल्प अदयाप अंतिम मंजूरी झाली नाही. विधानसभेची आचारसंहिता लागण्याची शक्यता आहे. बजेट मंजूर करून संपूर्ण प्रोसेस करण्यासाठी वेळ मिळाला पाहिजे. लोकसभेची आचारसंहिता होती मार्च पासून विकास कामे बंद आहे बजेट फायनल होत नाही त्यामूळे लहान मोठी कोणतीच कामे होत नाही ४-६ महिनेच विकास कामे करण्यासाठी मिळणार आहे विधान सभा नंतर महानगरपालिकेची आचारसंहिता लागेल.बजेट केव्हा सादर होणार व विकास कामे केव्हा होणार ५६५ कोटी बजेटला मंजुरी व त्याला खर्च करण्यास काळावधी लागेल. बजेट कधी ठेवणार. आपण काय निर्णय घेणार २००८ -०९ ला मंजुरी दिलेली आहे.

मा.महापौर : प्रशासनाने स्थायी समितीकडे बजेट सादर केलेले आहे मा.सभापती स्थायी समिती यांनी लवकरच बजेट सर्वसाधारण सभेपूढे सादर करण्याचे आश्वासन दिले. पूढील महिण्यात बजेट सादर होईल.त्यावर लगेच सभा आयोजित करून त्यास मान्यता देवून विकास कामे लगेच सुरूवात करण्यास प्राधान्य दिले जाईल.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : स्थायी समिती ने मंजुर केलेले आहे. मा.आयुक्तही होते बजेट पुस्तक तयार करण्यांस दिलेले आहे.

सौ.लता दलाल :महापालिकेत ४-५ दिवसापूर्वी म्हणजे या आठवडयात आरसीएच प्रकल्प अंतर्गत काही डॉक्टर, काही कर्मचारी व काही सेवकांना कायम स्वरूपी ऑर्डर देण्यात आलेल्या आहेत याबध्दल या सभागृहासमोर काही माहिती आलेली आहे का, सर्वसाधारण सभेसमोर तो प्रस्ताव मंजुरीसाठी आलेला आहे का याबध्दल माहिती दयावी आरसीएच प्रकल्प अंतर्गतचा जो प्रस्ताव झाला होता माझे माहिती प्रमाणे डॉ.कराड हे महापौर व मी उपमहापौर होते त्यावेळी मा.महापौर यांनी असे म्हटलेले होते की या प्रकल्प अंतर्गत सध्या कार्यरत कर्मचारी अधिकारी यांचा खर्च प्रकल्प समाप्तीनतंर महापालिकेच्या फंडातून करावा इथपर्यत ठिक आहे परंतु त्यांना कायमस्वरूपी वर्ग करावे असे या ठरावात नाही. सन १९९५, ९६, ९८ पासून अनेक अधिकारी कर्मचारी काम करतात त्यांना कायम केले नाही हा सुध्दा प्रकल्प ४ कोटीचा होता २ कोटी आले होते पुढील दोन

कोटी येणार होते तोपर्यत त्यांना ठेवायचे व पुढे काय करायचे या साठी या कर्मचाऱ्यांना मानुसकीच्या भावनेतून मान्यता दिली याचा अर्थ त्यांना सेवेत कायम स्वरूपी नियुक्त्या दयावे असे नव्हते.या कर्मचा-यांना कायमस्वरूपी घेणार असाल तर आरोग्य विभागातच वरील प्रमाणे अनेक दिवसापासून कर्मचारी कार्यरत आहे त्याचा काय विचार करणार माझ्या माहिती प्रमाणे सेविकांना ॲटेंडन्स यांना ६ महिण्यापासून सेवेत नव्हत्या त्यांना पाठवून त्यांना नियुक्ती पत्र पाठवून बोलवून घेतले असा हा कुठला कारभार चालतो या बद्दल व नियुक्त्या बद्दल संबधीत विभागाचे प्रमुखांनी खुलासा करावा. याच सभागृहात डॉ.वडेरा व इतर काही कर्मचारी यांचा प्रस्ताव आलेला होता त्यांना ऑर्डर दिली असतांना पुन्हा ती ऑर्डर रद्य करून परत या कर्मचाऱ्यांना अस्थायी म्हणून ठराविक दैनिक वेतनावर घेण्यात आले. मग हे कर्मचारी कोठून आले यांचे काही विशेष आहे का या कर्मचाऱ्यांचे कुणी नातेवाईक संबधातले या प्रशासनामध्ये कुणी आहेत का याचा पण खुलासा करावा व कोणत्या नियमाने केले कारण सभागृहात जो ठराव झाला त्यात कुठेतरी बदल होउन प्रस्ताव गेला असावा शासनाची दिशाभूल केली असावी कोणत्या नियमाने नियुक्त्या दिल्या याची चौकशी झाली पाहिजे तोपर्यत या नियुक्त्या थांबविण्यात याव्या आणि आरोग्य विभागातील सर्वच कर्मचाऱ्यांना या प्रमाणे कायमस्वरूपी सेवेत घेण्यात यावे कारण ते अगोदरपासून सेवेत आहे नसता त्यांचेवर अन्याय होईल. यापूर्वी काहींना नियुक्त्या दिल्या पुन्हा ऑर्डर परत घेता हा सर्वसाधारण सभेचा सुध्दा अपमान आहे परंतु कुणाचा तरी अक्षेप होता म्हणून त्या नियुक्त्या रद्य केल्या होत्या परंतु इथे मांत्र बिनबोभाट तीनच वर्षापासून कर्मचारी कामावर होते ते महापालिकेचे नाहीत तरी त्यांना कायमस्वरूपी सेवेत नियुक्त केले जाते हा अन्याय मुळीच होता कामा नये न्याय द्यायचा तर सर्वांना सारखाच दयावा नसता या दिलेल्या नियुक्त्या रद्य करण्यात याव्यात. या बाबतीत सर्व माहिती विभाग प्रमुखाकडून घेण्यात यावी.

श्री.काशिनाथ कोकाटे :सर्वसाधारण सभेने जे १९९५ पासून जेसीबी,वाहनचालक,लघुटंकलेखक पदे मंजूर होते ही पदे मंजूर असतांना देखिल अद्याप भरले नाही. ४ महिण्यापूर्वी जेसीबी चालक श्री.मदगे,श्री.बोडखे तसेच श्री.ठोकळ व आरोग्य विभागातील काही कर्मचाऱ्यांचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेला आलेला असतांना देखिल प्रशासनाने तो प्रस्ताव परत मागे घेत आहोत व सर्व अस्थायी कर्मचारी यांना एकत्रिक करून कार्यवाही होत आहे म्हणून तो प्रस्ताव थांबविण्याचे पत्र आपल्याकडे आलेले होते. चार वेळेस त्या पदांना मंजूरी आली चारही वेळेस रद्द करण्यात आले पद कुणासाठी व कशासाठी हे काम चाललेले आहे प्रशासन पारदर्शकपणे काम करीत असेल तर अशा प्रकारचा गोंधळ का होतो या आरसीएच प्रकल्पातील कर्मचाऱ्यांना कायमच्या ऑर्डर दिलेल्या नव्हत्या शासनाचा प्रकल्प आहे तो राबविला पाहिजे महापालिकेची मदत आवश्यक आहे म्हणून आरोग्य विभागावर कामाचा व्याप वाढू नये म्हणून नागरीकांना आरोग्याची सुविधा जास्तीत जास्त मिळावी म्हणून त्या कर्मचाऱ्यांना

अस्थायी कर्मचारी म्हणून ठेवावे असे आदेशीत केले होते परंतु त्यांना कायमस्वरूपी घेण्यात आले ते करीत असतांना कोणते नियमाचा अवलंब केला याचा खुलासा येथे होणे आवश्यक आहे. एका कर्मचारी यांना जरी नियुक्ती दयायची असेल तरी तसा ठराव या सभागृहासमोर यायला पाहिजे नसता या सभागृहावर तो अन्याय आहे तो दिशाभूल करणार आहे या कर्मचाऱ्यांना कायमस्वरूपी करावेच परंतु ज्यांचे प्रस्ताव या सभागृहात आलेले होते त्यांना परत केले त्यांनाही सेवेत कायम करावे.

श्री.रेणुकादास वैद्य: :आरसीएचला मुळ जी मंजूरी दिली होती त्याकडे जाणीवपुर्वक दुर्लक्ष करण्यात आले. या सभागृहाने काय मंजूर केले याकडे दुर्लक्ष केले गेले. एक समातंर अस्थापना विभाग आरसीएचच्या माध्यमातून चालवण्याचा प्रयत्न या ठिकाणी होतो आहे. अस्थापना विभागाचाच यास पाठिंबा असावा याशिवाय हे काम होवू शकत नाही. आरसीएच प्रोजेक्ट संस्थेला दिलेला आहे.ती संस्था चालवते ती संस्था भरती करते ते भरती झालेले लोक महापालिकेत कायमस्वरूपी ट्रान्सपर केले जातात संमातर अस्थापना विभाग चालविण्याचा प्रयत्न या ठिकाणी होत आहे ही गंभीर बाब आहे कोणाचीही मंजूरी न घेता परस्पर जो प्रकार चाललेला आहे तो गंभीर आहे याची बारीक चौकशी करून गुन्हे दाखल करावे अशी विनंती.

श्री.भगवान घडमोडे : आरसीएच प्रकल्पातंर्गत काही कर्मचारी कायमस्वरूपी नियुक्त केले पेपरला वाचले महापालिकेत अनेक कर्मचारी कित्येक वर्षापासून दैनिक वेतनावर काम करतात त्यांचे वय संपले परंतु त्यांना सेवेत कायम केले नाही. आरसीएच ही अशी कोणती योजना आहे त्यांना कायम केले शासनाने आदेश दिले कसे दिले कशाच्या माध्यमातून त्यांना कायम सेवेत घेतले आरसीएच ची मुळ योजना काय आहे कार्यपध्दती काय, त्या कर्मचाऱ्यांना मर्च का करून घेतले कारण काय ज्या काही गोष्टी व्हायला नको त्या मुद्दामहून केल्या जातात ज्यांना न्याय मिळायला पाहिजे त्यांना न्याय मिळत नाही असे होत आहे. कर्मचाऱ्यामध्ये अस्वस्थता पसरली की आरसीएच चे यांचा महापालिकेशी काडीमात्र संबध नसतांना कायम होतात परंतु वर्षानुवर्षापासून दैनिक वेतनावर या महापालिकेत अनेक कर्मचारी सेवा करतात त्यांना न्याय मिळत नाही. म्हणजे कर्मचाऱ्यांची मानसिकता खराब होवून एक प्रकारची महापालिकेच्या कामाला खिळ बसणार आहे. जो सभागृहात ठराव झाला होता तो आताच वाचून दाखवला त्या ठरावाचा गैरअर्थ लावला योग्य नाही असे माझे स्पष्ट मत आहे.आपल्या परीने सेवेत घ्यायचे व आपल्या पध्दतीनेच त्यांना वर्ग करून घ्यायचे काम होत असेल तर योग्य नसून इतर कर्मचाऱ्यावर अन्याय केल्यासारखे होईल म्हणून या केलेल्या नियुक्त्या रद्य केल्या पाहिजे थांबविल्या पाहिजे. व या प्रकरणाची सखोल चौकशी झाली पाहिजे. हे सर्व कर्मचारी कुणाच्या माध्यमातून नोकरीवर नियुक्त झाले कॉन्ट्रक्ट बेसीसवर होते किंवा कसे अशी पध्दत सुरू झाली तर कॉन्ट्रक्टर महापालिकेकडे येईल काम करेल व कर्मचाऱ्यांना घेण्याची जबाबदारी घ्यावी लागेल तेवढे बजेट

महापालिकेकडे आहे का? जनतेचा नुसता कर जमा करून पगार वाटप करणार का याचा सुध्दा खुलासा व्हावा जेव्हा प्रमोशन,पगार वाढ किंवा नोकर भरती करायची त्यावेळी प्रशासनातील खर्च हा बरोबर टक्केवारी नुसार होतो जेवढा अस्थापना खर्च तेवढे बजेट फुगवून दाखवायचे. अशी दिशाभूल करून मंजूरी घ्यायची असे प्रकार होतात या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करावी.

श्री.संजय जोशी : वेगळा मुद्दा मांडतो या सर्व गोष्टी आयुक्त जातांनाच का करतात पुर्ण वेळ काम करतांना त्यावेळी हया नियुक्त्या का केल्या नाही बदली होवून जाणार त्यापूर्वी एक किंवा दोन दिवस अगोदरच प्रमोशन नवीन नियुक्त्याची यादी येते त्यानुसार कार्यवाही होते.दुसऱ्या दिवशी वृत्तपत्रात येते आयुक्तांनी जाताजाता खिरापत वाटली,काही लिहितात कर्मचाऱ्यांचे भले केले. का बरे येथे बॉडी नाही का, लोकशाही पध्दतीने आम्हाला निवडूण दिले आहे. आयुक्तांनी साधारण भारतीय प्रशासन सेवेतील असा दंडक आहे असे मला वाटते जाता जाता असे काम आयुक्तांनी करू नये ज्या वेळेस पुर्ण वेळ येथे काम करीत होते.बदली होणार हे त्यांना माहित होते ८-१५ दिवसापूर्वी हे केले असते तर आम्ही त्यांना जाब विचारला असता आता विचारणा केली तर कार्यरत झालेले आयुक्त यांनाही प्रश्न पडेल की त्या आयुक्तांनी घेतलेल्या निर्णया बाबत मी काय निर्णय घेवू साहजिकच आहे.एक माणूस म्हणून सोबत सर्व्हीस करतात म्हणून त्यास हे आयुक्त सुध्दा बांधील राहतील. या पुर्वी असे घडलेले आहे पेव्हर ब्लॉकचे दीड दोन कोटी बिल ॲडव्हान्स देवून निघून गेले दुसरे आयुक्त आले त्यांनी चौकशी सुरू करणार तोच एकमेकांशी संपर्क झाला व ती कार्यवाही तेथेच थांबविली आयुक्तांनी जाता जाताच असे का केले.यापूर्वी ही जाता जाता आयुक्तांनी प्रमोशन केले आताही जाता जाता नियुक्त्या कुणी उधारीत परवानगी देतात या सर्व गोष्टी सभागृहाच्या भावना नगरविकास सचिव यांना कळविल्या पाहिजे नगरसेवक वाईट नाही येणारे आयुक्त जाता जाता काय करून जातात याचा सविस्तर अहवाल तयार करून शासनाला पाठवावा अशी सभागृहाच्या वतीने विनंती करतो.

श्री.प्रशांत देसरडा : आरसीएच व औरंगाबाद महानगरपालिकेचा दुरदुर संबध नाही आरसीएच अंतर्गत जे काम चालते त्यांची वेगळी ट्रस्ट आहे यात आयुक्त हे अध्यक्ष व आरोग्य अधिकारी हे सचिव आहे त्याचे धर्मादाय आयुक्त विभागाकडे रजिस्ट्रेशन असते जरी सेकंन्ड सर्टिफिकेट घेतले असले नसले तरी करोडो रूपये खर्च केले असे भारतात कुठेही उदाहरण मिळणार नाही.मा.धर्मादाय आयुक्तालयाकडून दोन सर्टीफिकेट घ्यावे लागतात या आरसीएचकडे एकच होते.जेंव्हा ठराव या सभागृहात आला होता त्यावेळी मी आरसीएच प्रकल्पातील कर्मचाऱ्यांना कॉन्ट्रॅक्ट बेसेस वर का भरती करीत नाही प्रशासनाला प्रश्न केला होता त्यावेळी आयुक्तांनी असा खुलासा केला की सदर कर्मचारी कॉन्ट्रॅक्ट बेसेसवर भरती केले जातील इतिवृत्तात तशी नोंद आहे.शासनाला जेंव्हा पत्रव्यवहार केला त्यावेळी सदर ४० कर्मचारी हे महापालिकेच्या सेवेत

आहे म्हणून कायम करण्याची मंजूरी दयावी म्हटलेले होते यात शासनाची प्रशासनाने दिशाभूल केली आहे.जो कर्मचारी महापालिकेच्या सेवेत अस्थायी दैनिक वेतनावर कार्यरत असेल त्यांना सेवेत कायम करता येते. अनेक प्रकरण न्यायालयात आहे. मा.सर्वोच्च न्यायालयाचे असे निर्देश आहेकी,कर्मचारी भरती करतांना वृत्तपत्रात ओपन जाहिरात देवून भरती केले पाहिजे. ४० पदे जी निर्माण केली जो प्रस्ताव आणला ती पदे वेगळी व आता भरती केलेले वेगळे यात एक ऑडीटर म्हणून पद आहे. आपणांकडे मुख्यलेखा परीक्षक, मुख्यलेखाधिकारी असतांना त्या पदाची येथे आवश्यकता काय जे मिळाले ते घेतले या प्रमाणे शासनाकडे यादी पाठविली व हे कर्मचारी महापालिकेच्या सेवेत आहे यांना कायम करण्याची परवानगी दयावी असे पत्र व्यवहार मा.सचिव यांना केला त्यानुसार या पदांना मंजूरी दिली. हे कर्मचारी फेज-२ चे आहेत फेज -१ च्या कर्मचाऱ्यांवर का अन्याय होतो असा भेदभाव का असे ही कळाले की फेज-१ चे कर्मचारी भेटले नाही. एक तर खुल्या पध्दतीने वृत्तपत्रात जाहिरात देवून लेखी,तोंडी चांचणी घेवून ही पदे भरावयास पाहिजे होती. प्रशासकीय खर्च हा ३५ टक्के पेक्षा जास्त व्हायला नको परंतु वसुलीचा विचार केला तर हा खर्च ४५ टक्केपर्यत जात आहे. जे शासनाकडे पाठवले त्यात असे म्हटले की खास बाब म्हणून मंजूरी दयावी एवढी काय आवश्यकता होती या पदांना मंजूरी घेणे आवश्यकच होते.महापालिकेत लाईनमन असतील सुरक्षा रक्षक असतील पदे रिक्त असतांना अस्थायी कर्मचाऱ्यामधून भरती केली जात नाही. २५-२५ वर्ष झाले कायम करित नाही झोनचे एक कर्मचारी दैनिक वेतनावर सेवा करून निवृत्त झाले. ३५ टक्केच्या खर्चात बसत नाही परंतु प्रशासनाने त्यांचे बाबतीत खास बाब म्हणून शासनाकडून त्यांना सेवेत कायम करण्याबाबत परवानगी मागीतली नाही. हा सर्व प्रकार संशयास्पद आहे शासनाकडून या पदांना मंजूरी आल्यानंतर या सभागृहाची मंजूरी घेणे जरूरी आहे की नाही जी नोकर भरती निवड समिती आहे त्यात सुध्दा चुकीचा प्रस्ताव ठेवला त्यामूळे पूर्ण प्रकरणाची चौकशी व्हावी व तोपर्यत या कर्मचाऱ्यांना आरसीएच प्रकल्पा अंतर्गत काम करण्याची बंदी घालावी.

श्री.अ.साजेद अ.सत्तार:या प्रकरणी महानगरपालिकेने मा.प्रधान सचिव यांना दिं.२२-११-२००७ रोजी एक पत्र पाठवून त्यात असे दिले की महानगरपालिका औरंगाबाद अंतर्गत आरोग्य सेवेसाठी ४० प्रस्तावित पर्जन्य व बाल आरोग्य कार्यक्रम अंतर्गत भरण्यात आलेली पदे कॉन्ट्रक्ट बेसीसवर घेतलेले होते. परंतु महापालिकेचे तत्कालीन आयुक्त यांनी असे लिहिले की या कार्यक्रम अंतर्गत भरण्यात आलेली पदे महापालिका अस्थापनेवर समावून घ्यायची आहे.प्रकरणी वरील प्रमाणे प्रकल्प अस्थापनेवर पर्जन्य व बाल आरोग्य सेवेसाठी वरील प्रमाणे नमुद केलेली ४० पदे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५१(४) नुसार औरंगाबाद महानगरपालिकावर अस्थापनेवर तातडीने शासनाची मान्यता देण्यात यावी. हे कर्मचारी महापालिकेने कॉन्ट्रॅक्ट बेसीसवर घेतलेले आहे असा

कुठेही उल्लेख केलेला नाही.शासनाची दिशाभूल करून व शासनाला एकूण ०७ पत्रे दिलेली आहे.नियुक्त्या करण्या बाबतचे धोरणात्मक निर्णय घेण्याचे अधिकार सर्वसाधारण सभेला आहे. जोपर्यत नावासहीत सर्वसाधारण सभा कोणत्याही पदाला मान्यता देत नाही तोपर्यत पदे भरता येत नाही.परंतु हे आदेश काढतांना सर्वसाधारण सभेची मंजूरी घेण्यात आलेली नाही.तसेच पदाधिकारी स.सदस्यांना विश्वासात घेण्यात आले नाही.ज्या नियुक्त्या केल्या त्यास स्थागिती दयावी स्थायी समिती मध्ये या प्रकरणात मुख्य लेखा परीक्षक यांची कमेटी केलेली आहे त्यांचा अहवाल येईलच सत्यता काय आहे समजेल मा.सर्वोच्च न्यायालयाने नोकर भरतीच्या प्रकरणामध्ये असा निर्णय दिला की मागच्या दाराने कुणी कर्मचारी भरती करू नये कोणतेही पद भरतांना स्पर्धा झाली पाहिजे अस्थापनेवर १२ ते १५ वर्षापासून काही कर्मचारी कार्यरत आहे त्यांना कायम सेवेत न घेता कॉन्ट्रॅक्ट बेसीसवर असलेल्या कर्मचाऱ्यांना सेवेत कायम करण्याची ॲक्ट मध्ये कोणतीही प्रोव्हीजन नाही. जे आदेश दिले त्यास स्टे दयावा या प्रकरणाची सखोल चौकशी करून पुढील कार्यवाही करावी.

सौ.लता दलाल सभागृहाचे नियम धाब्यावर बसून काही गोष्टी घडतात त्याबद्यल सदस्यांनी मत व्यक्त केले गेल्या आठ दिवसात मा.आयुक्तांनी जे प्रमोशन किंवा बदल्या जे काही केले असेल त्यांची चौकशी व्हावी आयुक्तांचीही चौकशी करावी व शासनाकडे पाठविण्यात यावे जेणे करून अशा गोष्टीना खीळ बसेल.

डॉ.भागवत कराड :या महापालिकेला केंद्र शासनाकडून आरसीएच-१,२ प्रकल्प मंजूर करण्यात आले होते या प्रकल्प अंतर्गत महापालिकेला अनुदान मिळाले होते अनुदान मिळाल्यानंतर जे कर्मचारी नियुक्त केले ते कॉन्ट्रॅक्ट बेसीसवर घेतले होते त्यांना सेवेत कायम घेण्यात यावे अशा प्रकारचा ठरावा केंव्हाही झालेला नाही.त्या कर्मचाऱ्यांना महापालिकेच्या फंडातून रक्कम दयावी असा २००७ चा ठराव आहे कॉन्ट्रक्ट जो असेल जे काही पैसे दयायचे असतील पगार दयायचा असेल त्यात त्यांनी चालवावा असे ठरलेले होते.परंतु त्यानंतर महापालिका प्रशासनाने शासनाकडे पत्रव्यवहार केला व त्यांचे कायमस्वरूपी नियुक्ती देण्यासाठी पदास मान्यता घेणेसाठी प्रयत्न केला हे या सभागृहाला माहित नाही. महापालिकेत २६०-२७० कर्मचारी अस्थायी म्हणून अनेक वर्षापासून कार्यरत आहे त्यांना सेवेत कायमकरण्यासाठी व त्यापदांना शासनाकडून मंजूरी आणून त्यांना सेवेत कायम करण्या बद्यल काही केले नाही परंतु कॉन्ट्रक्ट बेसीसवर जे आरसीएच प्रकल्पा अंतर्गत कर्मचारी होते त्यांना कायमस्वरूपी नियुक्तीचे आदेश दिले हे चुकीचे असून या सभागृहाला अंधारात ठेवून हे केलेले काम आहे.प्रशासनामध्ये जे कुणी जबाबदार असतील त्यांचेवर कार्यवाही करण्याची गरज आहे ही सभागृहाची भावना आहे वाटेल तर तसा ऐनवेळी ठराव घ्यावा व केलेल्या नियुक्त्या हया रद्य कराव्यात.

श्री.गजानन बारवाल :आरसीएचमध्ये झालेला घोटाळा मोठा आहे हे सध्यातरी दिसून येते. या बाबतीत गांभीर्याने लक्ष देवून या बाबतीत खुलासा घेण्यात यावा खुलासा झाल्यानंतर जे दोषी असतील त्यांचे वर कडक कार्यवाही करण्याच्या दृष्टीने गुन्हेनोंद करावेत.ज्या नियुक्त्या झाल्या त्या लगेच रद्द कराव्यात.

मा.महापौर :अस्थापना विभागाचे अधिकारी यांनी खुलासा दयावा.

श्री.प्रशांत देसरडा :आरसीएच प्रकल्प हा आरोग्य विभागाशी निगडीत आहे त्या विभागाकडून खुलासा घेण्यात यावा.

आरोग्य वैद्य. अधि. :आरसीएच किंवा इसीएसआयपी या नावाने ओळखला जाणारा कार्यक्रम १९९९ साली सर्वसाधारण सभेच्या ठरावानुसार शासनाला कळविले होते की,या महापालिका क्षेत्रामध्ये हा कार्यक्रम राबविला जावा त्याप्रमाणे सन २००२ साली हा कार्यक्रम सुरू झाला सुरूवातीला इसीएसआयपी कार्यक्रमाच्या अंडर एक वर्ष या कार्यकमाच्या प्रिपरेशनसाठी नंतर ४ वर्ष हा कार्यक्रम चालेल असे जाहिर केले होते.यासाठी पुर्ण फंड हे शासन देणार होते. हा कार्यक्रम पुर्ण शासनातर्फे मंजूर करण्यात आला होता. शासनाने त्याचवेळी महानगरपालिकेकडून असे इशुंरन्स घेतलेले होते की हा कार्यक्रम पुढे बंद पडता कामा नये.महापालिकेने पुढे कन्टीन्यू ठेवावा तसे इंशुरन्स सर्वसाधारण सभेने व आयुक्ताच्या मार्फत देण्यात आलेले होते.त्याप्रमाणे हाकार्यक्रम २००२ साली चालू झाला २००६ पर्यंत चालू होता.या कार्यक्रमासाठी लागणारे सर्व कर्मचारी कॉन्ट्रक्ट पध्दतीने पदे भरलेली होती कायमची नियुक्त म्हणता येणार नाही सन २००६ साली हा कार्यक्रम संपला त्यावेळी शासनाने यास एक वर्षाची मुदतवाढ दिली त्यानुसार २००७ पर्यत कार्यक्रम चालू राहिला.२००७ मध्ये शासनाने ज्या प्रमाणे अगोदर सांगितलेले होते की हे नंतर महानगरपालिकेने घ्यावे त्या प्रमाणे या लोकांना म्हणजे इसीएसआयपी हा कार्यक्रम बंद झाला आणि आरसीएच फेज -२ कार्यक्रम सुरू झाला. जो शासन अजूनही चालविते सन २००७-१० असा तीन वर्षाचा तो कार्यक्रम आहे.या सर्व कार्यक्रमातून इसीएसआयपी असो किंवा आरसीएच असो शासनातर्फे ज्या योजना त्यात माता बाल संगोपण, इमॉनायजेशन कार्यक्रम,गर्भलिंग चाचणी कार्यक्रम हे सर्व कार्यक्रम शासनाच्या या माध्यमातून राबविले जातात.

सौ.लता दलाल :या नियुक्त्यांच्या संदर्भात आरोग्य विभागाकडून अस्थापनाकडे काही पाठविले होते का प्रकल्प काय हे आम्हाला माहित आहे.या नियुक्त्या करण्या संदर्भात कुणाचे मागणी झाली होती का कुणाचे पत्र आलेले होते का?

आरोग्य वैद्य. अधि. :सन २००७ साली या सभागृहाने असा ठराव केला की आर सी एच पूढे ठेवावे त्या प्रमाणे मा.आयुक्तांनी शासनाला कळविले होते.

श्री.रेणुकादास वैद्य :आर.सी.एच.कर्मचारी महापालिकेने घेतले की खाजगी कॉन्ट्रक्टरने घेतले होते.

आरोग्य वैद्य. अधि. :हे कर्मचारी कॉन्ट्रक्ट बेसीसवर होते.त्यांची भरती ही जाहिरात देवून केलेली होती. लिंक वर्कर आहे शासनाने सुरूवातीला कॉन्ट्रक्टरच्या मार्फत भरवयास सांगितले आहे.

श्री.देसरडा प्रशांत :४० कर्मचारी हे कॉन्ट्रक्ट बेसीसवर भरणार आहे मा.आयुक्तांनी ठराव सादर झाला त्यावेळी म्हटले होते. कायम सेवेत घेणेसाठी प्रस्ताव शासनाकडे पाठविला होता का ?

आरोग्य वैद्य. अधि. : पुढे या कर्मचा-याचे काय करायचे असे शासनाला विचारणा केलेली होती.

श्री.रेणुकादास वैद्य : आताच अधिका-यांनी खुलासा केला जे कर्मचारी भरती केले ते कॉन्ट्रक्टरनी भरती केले त्यांचा महापालिकेशी संबध नाही.असे असतांना महापालिकेने प्रस्ताव सादर केला का केला असेल तर का केला याचा खुलासा व्हावा. कन्ट्रॅक्टरतर्फे भरलेले कायम करू शकतो का?

श्री.अ.साजेद अ.सत्तार:कॉन्ट्रक्ट बेसीसवर ज्या कर्मचा-यांना घेतले त्यांना सेवेत नियमानुसार कायम करता येते का?

मा.महापौर :कोणत्या नियमानुसार नियुक्त्या केल्या शासनाकडे पाठविले त्या अगोदर सर्वसाधारण सभेची मान्यता घेतली होती का? अस्थापना विभागाकडे आरोग्य विभागाने मागणी केली होती का ?

श्री.अ.साजेद अ.सत्तार : सेवेत कायम करण्याचे आदेश आरोग्य विभागाने काढलेले नाही.

डॉ.भागवत कराड :या कर्मचा-यांना सेवेत कायम करण्याचा ठराव या सभागृहात झाला नसेल तर कोणत्या बेसवर प्रशासनाने शासनाकडे पाठविलेला होता.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : आरसीएच बाबत आरोग्य विभागाने माहिती दिली नियुक्तीचे आदेश अस्थापनाकडून झालेले आहे. ते कोणत्या नियमानुसार झाले याचा खुलासा घेण्यात यावा.

श्री.भगवान घडमोडे :सदर कर्मचारी हे कॉन्ट्रक्टरचे होते की कॉन्ट्रक्ट बेसीसवर होते.

आरोग्य वैद्य.अधि. :कॉन्ट्रक्ट बेसीसवर घेतलेले होते.पेपरला जाहिरात देवून मुलाखती घेवून घेतलेले होते. लिंक वर्करसाठी शासनाने असे सांगितले होते की एक एजन्सी दिली होती लिंक वर्करची नियुक्ती आपणाकडून होत नाही.लिंक वर्कर हे एजन्सीच्या मार्फत घेतलेले आहे.

श्री.भगवान घडमोडे :एजन्सीचे होते तर ती जबाबदारी महापालिकेने का घेतली.

सौ.लता दलाल :युरोपीय कमीशनच्या मार्फत आरसीएच योजना आलेली ही एका संस्थेच्या मार्फत आलेली होती माझे माहिती प्रमाणे आयुक्त हे त्याचे पदसिध्द अध्यक्ष आहेत. व आरोग्य अधिकारी हे सचिव आहेत लिंक वर्करची माहिती देता उर्वरीत डॉक्टर क्लार्क व सेविका असतील यांची नियुक्ती कशी झाली.

आरोग्य वैद्य. अधि. :सदर कर्मचारी एका कार्यक्रमा अंतर्गत काम करीत होते त्यांना कायम सेवेत घ्यावे असा कोणताही विषय नाही.

श्री.अ.साजेद अ.सत्तार:जे पत्र शासनाकडे दिले त्यात सर्व काही शासनाच्या निदर्शनास आणून दिलेले आहे.औरंगाबाद महानगरपालिका पर्जन्य व बाल आरोग्य सेवेसाठी शहरात करण्यात आलेले रूग्णालय व व्यवस्थापन या कामासाठी औरंगाबाद महानगरपालिकेतील अस्थापना वरील प्रमाणे पदाची आवश्यकता आहे वरील ४० पदे महापालिका असथापनेवर निर्माण केल्यास त्याकरीता प्रचलित वेतनश्रेणी मासिक रू. ४,३६,१३५ व वार्षिक खर्च रू.५२,३३,४२० इतका अपेक्षीत आहे.हे सुध्दा शासनाला कळविलेले आहे.

श्री.देसरडा प्रशांत :प्रशासनाने जो काही पत्र व्यवहार केला त्यात असे म्हटले आहे की ते महापालिकेच्या अस्थापनेवर होते.सर्वसाधारण सभेची मंजूरी घेतली नाही

श्री.अ.साजेद अ.सत्तार कॉन्ट्रक्ट बेसीसवर घेतलेले आहे.शासनाला पाठविलेल्या पत्रात कुठेही म्हटले नाही.

श्री.संजय जोशी :या नियुक्त्यांच इलिगल आहेत जाता जाता झालेल्या आहे.या नियुक्त्याला स्थगिती दयावी हा विषय संपवावा.

श्री.प्रशांत देसरडा<br>श्री.भगवान घडमोडे :रद्द करण्यात याव्यात.

सौ.लता दलाल :हा विषय रद्द करण्यात यावा. तसेच जाता जाता अशा या नियुक्त्या होतात त्या बाबत सुध्दा आयुक्तांची चौकशी व्हावी व शासनाास कळवावे.

श्री.भगवान घडमोडे :शासनाकडे जो पत्रव्यवहार केला त्यात सुध्दा प्रशासनाने चुकीची माहिती देवून शासनाची दिशाभुल केली. त्याचाही उल्लेख करावा.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : शासनास चुकीची माहिती देवून या पदास मंजूरी मिळविली आहे. याचा सुध्दा उल्लेख शासनाकडे पाठविल्या जाणाऱ्या अहवालात करावा.

मा.महापौर :आरसीएचच्या विषयाबाबत या सभागृहाने बरीच चर्चा केलेली आहे आणि मुळात या सभागृहाची अशी भावना आहे की कॉन्ट्रॅक्टवर जे कर्मचारी होते त्याकर्मचाऱ्यांना महानगरपालिकेच्या सेवेमध्ये सामावून घेण्याकरीता प्रशासनाने प्रयत्न केलेले आहे. या करीता कोणत्याही प्रकारची माहिती/ मंजूरी किंवा कोणत्याही प्रकारचा पत्रव्यवहार किंवा कोणतीही माहिती सर्वसाधारण सभेला प्रशासनाकडुन मिळालेली नाही. ज्या पध्दतीने आरसीएचच्या कर्मचाऱ्यांची नियुक्ती झालेली आहे ती नियुक्ती संशयास्पद अशीच आहे. आत्ताच स.सदस्यांनी भावना व्यक्त केल्या की, या महानगरपालिकेमध्ये असे अनेक कर्मचारी आहेत जे वर्षानुवर्ष दैनिक वेतनावर कामे करतात. स.स.श्री.प्रशांत देसरडा यांनी एक उदा.दिले की,त्यातील एक कर्मचारी वाट बघता बघता आता रिटायर्ड झाला त्याला कायमस्वरूपी नियुक्ती मिळु शकली नाही. असे अनेक विषय जेव्हा असतात सगळे बाजूला ठेवून प्रशासनाने ज्या पध्दतीने आरसीएचच्या कर्मचाऱ्यांची नियुक्ती केलेली आहे हि अत्यंत संशयास्पद वाटते. म्हणून मा.आयुक्तांनी या प्रकरणाची सखोल चौकशी करावी अशा प्रकारचे सर्वसाधारण सभेचे जे विषय आहेत त्यांना या सभागृहाची मंजूरी असणे आवश्यक आहे आणि ज्या ज्या गोष्टी सर्वसाधारण सभेच्या मान्यता घेवून करणे आवश्यक आहे त्या न करण्याचा प्रशासनाने साहस करू नये.असे प्रशासनाला बजवायचे आहे. अशा पध्दतीने प्रशासनाने कोणतेही निर्णय घेवू नये. यामध्ये शासनाला माहिती कळविलेली आहे.त्यामध्ये शासनाची दिशाभुल झालेली आहे. जी पदे इथे कॉन्ट्रेक्ट बेसीसवर होत्या त्या कायमस्वरूपी नव्हत्या त्या भरण्याकरीता त्याची मान्यता घेण्याकरीता शासनाला कळविण्यांत गेलेले आहे. हे आजच्या घटकेला अत्यंत चुकीचे वाटते आहे. या प्रकरणाची पुर्णपणे चौकशी व्हावी. ज्यावेळी सर्वसाधारण सभेने असे कोणत्याही प्रकारचे आदेश दिले नव्हते अशा प्रकारे शासनाला कसे पत्र पाठवू

शकतो. त्यामुळे याही संपूर्ण घटनेची चौकशी करावी आणि काय घटनाक्रम झाला कशा पध्दतीने हे घडले गेले चौकशी करून जे अधिकारी चुकीचे आहेत त्यांच्यावर कडक कारवाई करावी आणि हा प्रस्ताव रद्द करण्यात यावा आणि ज्याज्या वेळी मा.आयुक्त काही निर्णय घेतात तेव्हा ते निर्णय पारदर्शक घेणे आवश्यक असते सभागृहापुढे आणने आवश्यक असते. अशा प्रकारचे निर्णय घेतले आणि तशी स.सदस्यांनी भावना व्यक्त केली नंतर सुटटीवर जातात असे काही होते. आयुक्त शेवटी हे आमचे आहे यामध्ये अशा प्रकारची वाव राहील अशा प्रकारची कृती होवू नये अतिशय पारदर्शकपणे पुढील व्यवहार व्हावे अशा प्रकारने आदेशीत करण्यात येते.

श्री.संजय जोशी :समांतर जलवाहिनीसाठी निधी आला त्यांचा विनियोग कसा करणार आहे काय काम व टेंडर प्रोसेस कशी करणार आहे सविस्तर माहिती द्यावी.

मा.महापौर : केंद्र शासनाच्या माध्यमातून राज्य शासनाकडून या कामासाठी अनुदान मिळालेले आहे जलवाहिनीचे काम केंव्हा सुरू होणार आहे. काय उपाय योजना केल्या,कुणाला काम दिले कशा पध्दतीने या समातंतर जलवाहिनीचे काम होणार आहे याचा सविस्तर खुलासा करावा.

श्री.संजय जोशी :युनीटी नावाचे एजन्सीला काम देवू एजन्सी शासनाकडून निधी उपलब्ध करून आणण्यास मदत करणार त्या एजन्सीला २.३ टक्के रक्कम महापालिका देणार होती हे अनुदान आमदार खासदार यांनी पुढाकार घेवून मिळविला तर एजन्सीला २.३ टक्के कशाबध्दल देणार आहे.

डॉ.भागवत कराड :समांतर जलवाहिनी व्हावी म्हणून अनेकदा चर्चा झाली ठराव सुध्दा मंजूर झाला ३६० ते ३७० कोटी आलेले आहे.युनीटीला करणार होते तेंव्हा ६००-६५० कोटी आणावेत असा तो प्रस्ताव होता आलेला निधी हा लोकप्रतिनिधीच्या प्रयत्नाने आलेला आहे युनीटी एजन्सीमुळे नाही त्यामूळे या एजन्सीला कोणतेही टक्केवारी न देता महापालिकेने काम चालू करावे ६०० कोटी आणले असेल तर करावे.

श्री.प्रशांत देसरडा :स्थायी समितीने पीएमसीनियुक्त केली आहे पीएमसीच्या माध्यमातून ५-२-२मध्ये डायरेक्ट काम देवून टाकले आहे.कोणाचीही मन:स्थिती नाही.

कार्य.अभियंता (श्री.पानझडे) : यामध्ये युनीटी कन्स्ल्टन्सी याची नेमणूक झाली आहे.सन २००५-०६ च्या एमजीपीच्या डीएसआर नुसार मा.आयुक्त श्री.गुप्ता साहेब यांचे कार्यकाळात पॅरलल पाणी पुरवठयाचा एक प्रोजेक्ट केंद्र शासनाकडे UIDSSMT या योजने अंतर्गत सादर केला होता.त्यानंतर तत्कालीन आयुक्त श्री.बंड साहेब आले तेंव्हा तोच प्रोजक्ट नवीन DSR नुसार नवीन योजना तयार करून केंद्र शासनास सादर करावे असे आदेश मिळाले त्यानुसार ०७-०८ च्या डीएसआर नुसार प्रस्ताव तयार केला तो ४९५ कोटीची योजना तयार करून ती युनीटी एजन्सीच्या मार्फत मा.सर्वसाधारण सभेच्या पुर्व मान्यतेने तो प्रस्ताव केंद्र शासनाकडे पाठविण्याची कार्यवाही झाली.

डॉ.भागवत कराड :पुर्वी प्रस्ताव किती कोटीचा व एजन्सीने किती कोटीचा केला होता आता मंजूरी किती रक्कमेला आली.

कार्य.अभियंता (श्री.पानझडे) : युनीटी एजन्सीच्या मार्फत पाठवायचा प्रस्तास ४९५ कोटीचा व महापालिकेने तयार केलेला ३६० कोटीचा प्रस्ताव होता.

श्री.अ.साजेद अ.सत्तार: युनीटी कन्स्ल्टन्सीला ५ टक्के प्रमाणे रक्कम दयावी असा सर्वसाधारण सभेने ठराव मंजूर केला स्थायी समितीने एजन्सीला २.३० टक्के प्रमाणे देण्याचे मान्य केले समातंतर जलवाहिनी करणे गरजेचे आहे. यात कुणी राजकारण करू नये.

डॉ.भागवत कराड :समांतर जलवाहिनी व्हावी यासाठी ३ वर्षापासून प्रयत्न चालू आहे ३६० कोटीचा प्रस्ताव मंजूर झालेला आहे जो ६५० कोटीचा होता तो मंजूर झालेला नाही.

श्री.अ.साजेद अ.सत्तार :त्यावेळी का मंजूर झाले नाही. डॉ.कराड हे महापौर होते मी विरोधी पक्ष नेता होतो तेंव्हा १६ वेळा गेलो. ५२ लक्ष दिल्लीला जा-ये करण्यासाठी खर्च केले. नागरीकांना पाण्याची गरज आहे हे काम होणे आवश्यक आहे. त्यावेळी का नाही झाले.

कार्य.अभियंता(ब व क) :दिल्लीला जावून केंद्र शासनाकडून अनुदान मंजूर करून आणण्यासाठी एजन्सीला टक्केवारी देता असा अर्थ होत नाही.एजन्सी ३-४ वर्ष काम करणार आहे त्यात टोटल कंन्सल्टन्सी आहे, सुपरव्हिजन करणे, टेंडरींग करणे,तसेच टीमवर्कही असणार आहे एजन्सीने कार्यालय घेतले प्रोजेक्ट मॅनेजमेंन्ट कन्स्ल्टन्सी आहे. प्रोजेक्ट पुर्ण होईपर्यत एजन्सी महापालिके सोबत काम करणार आहे.

श्री.संजय जोशी :युनीटी कन्स्ल्टन्सीने किती रक्कमेचा प्रोजेक्ट केला होता.

कार्य.अभियंता-ब व क :एजन्सीने ४९५ कोटीचा प्रोजेक्ट केला ३६० कोटीच्या प्रोजेक्टला सुध्दा एजन्सीने प्रयत्न केले.

श्री.रेणुकादास वैद्य :एजन्सी जेंव्हा प्रोजेक्ट कार्यान्वित करेल पाणी आल्यावर पेमेन्ट दयावे.

श्री.संजय जोशी :या निधीतून समातंर जलवाहिनी फारोळा पर्यंतच होईल शहरातील डिस्ट्रीब्युशन लाईन बदलाव्या लागणार आहे. अगोदर कोणते काम करणार आहे. सकाळी ४.०० ते रात्री ११.०० पर्यंत पाणी पुरवठा चालू असतो पाणी वाढवून वाटप होणार आहे का अगोदर डिस्ट्रीब्युशन लाईन करणे गरजेचे आहे.आताच म्हटले युनीटी एजन्सीने प्रोजेक्ट केला परंतु त्यावेळी मा.न्यायालयाची स्थगिती होती. स.सदस्य यांनी न्यायालयात प्रकरण दाखल केले होते. एजन्सीला वर्क ऑर्डर दिली आहे का?

कार्य.अभियंता-ब व क :एजन्सीला वर्क ऑर्डर दिली आहे.न्यायालयातील प्रकरण मागे घेतलेले आहे.

श्री.अ.साजेद अ.सत्तार :स.सदस्यांनी न्यायालयातील प्रकरण मागे घेतले आहे. मंजूरी देतांना ही बाब रथायी समितीने पडताळून घेतली आहे.सत्ता आहे म्हणून कुणी वेगळीच माहिती विचारून राजकारण करू नये. समांतर जलवाहिनी करायची नसेल तर तसा ठराव घ्यावा.

श्री.गजानन बारवाल :राजकारण करीत नाही काम करण्यासाठी आलेलो आहे. मा. खासदार श्री.खैरे साहेब यांनी या निधीसाठी प्रयत्न केले हे सर्वांना माहित आहे. पेपरमध्ये आले. सभागृहाने मान्य केले दुमत असण्याचे कारण नाही.

याचवेळी मा.महापौर डायस समोर मोठमोठयाने बोलणे चालू असते.

मा.महापौर :सर्वांनी आपआपल्या जागेवर बसावे.

श्री.अ.साजेद अ.सत्तार :मा.खैरे साहेब यांनी प्रयत्न केले त्यांचे अभिनंदन करतो परंतु एका व्यक्तीकडून यासाठी काम झालेले नाही सर्वांनी प्रयत्न केले.

श्री.वसंत नरवडे :नागरीकाच्या जिव्हाळयाचा हा प्रश्न आहे तो मार्गी लागलेला आहे आता वाद करून अर्थ नाही. नसता पुन्हा नागरीक पाण्यापासून वंचित राहतील. युनीटी कन्स्टल्टटचा प्रोजेक्ट मंजूर झाला काम संपेपर्यत त्यांचा त्यात समावेश आहे. स्थायी समितीला प्रस्ताव मंजूर झाला होता सर्व झाल्यानंतर वाद करणे योग्य नाही.

श्री.संजय जोशी :युनीटी क्रिशल दोन दोन एजन्सी नेमल्या चर्चा केल्यास वादाचा विषय होईल. युनीटीने निधी आणायचा प्रोजेक्ट करायचा यासाठी २.३० टक्के मंजूर केले आहे.

श्री.नरवडे वसंत : एका व्यक्तीमूळे निधी मिळाला असे म्हणता येत नाही. सर्वांच्या सहकार्याने हे काम झाले आहे.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : अनुदान मिळण्यासाठी कार्यवाही सुरू झाली तेंव्हा केंद्र शासन राज्य शासनाने पीएमसी असावी म्हणून विचारणा केली. कूठलेही बाबतीत राजकारण करायचे ते करा.

श्री.रेणुकादास वैद्य : राजकारण नाही. प्रश्नांची माहिती पाहीजे.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : सर्वसाधारण सभेने का मंजूर केले.

श्री.रेणुकादास वैद्य : आम्ही मूळ प्रश्न विचारला, त्याचे उत्तर अपेक्षित आहे. राजकारण नाही. अधिकाऱ्याकडून उत्तर अपेक्षित आहे.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : माझे कर्तव्य आहे.

मा.महापौर : स्थायी समितीने जे निर्णय घेतले त्याविषयी सभापती म्हणून त्यांनी माहिती दिली.

श्री.संजय जोशी : मान्यता येवून १ महिना झाला काय कार्यवाही केली कोणकोणती कामे करणार आहे आचारसंहिता लागण्यापुर्वी टेंडर अंतिम होणार आहे का?

डॉ.भागवत कराड :समांतर जलवाहिनी व्हावे सर्वांची इच्छा आहे यात राजकारण नको जेंव्हा मान्यतेचे पत्र आले त्यावेळी सर्वांचे अभिनंदन केले.अधिका-यांचा खुलासा घ्यावा.काम लवकरात लवकर करण्या बाबत कार्यवाही व्हावी.

श्री.सय्यद खुसरो :नागरीकांच्या जिव्हाळयाचा प्रश्न आहे पाणी मिळत नाही आम्हाला उत्तर दयावे लागते टेंडर व पुढील जी प्रोसेस असेल ती तात्काळ करून काम सुरू करावे.

श्री.संजय जगताप :लवकरात लवकर टेंडर कॉल करून पुढील कार्यवाही करावी.

कार्य.अभियंता-ब व क : टेंडर मोठे आहे एक महिण्यात या टेंडर प्रोसेसची व एमओयूची कागदपत्रे तयार करण्याचे काम प्रगतीपथावर आहे.यात पीएमसीचा ही सहभाग आहे. एमओयूच्या संदर्भात २० तारखेला मुंबई येथे बैठक आयोजित केली आहे. एमओयू करून त्यानंतर टेंडर प्रोसेसची कागदपत्र तयार करून वेबसाईटवर अपलोड करणार आहोत.येत्या आठवडयात टेंडर नोटीस होईल, अशी अपेक्षा आहे. ३६० कोटीमध्ये १०६ कोटीचे डिस्ट्रीब्युशन वर्कचे काम सुध्दा होते.त्यातील ४० कोटीचे नुकतेच काम सुरू झाले उर्वरीत २५५ कोटीचे पॅरलल लाईनचे जे जायकवाडी ते नक्षत्रवाडीपर्यतच्या कामाचे टेंडर काढणार आहोत.त्या कामाचे रिवाईज अंदाजपत्रक केले,टेंडर काढायचे या संदर्भात २०

तारखेच्या बैठकीत निर्णय होईल त्यानंतर कार्यवाही सुरू होईल. शहरातील डिस्ट्रीब्युशन लाईनसाठी शासनाकडे निधी मागितला होता परंतु ३६० कोटीपेक्षा जास्त अनुदान मंजूर होवू शकत नाही असे शासनाचे म्हणणे आहे. डिस्ट्रीब्यूशन साठी महापालिकेने खर्च करावा परंतु तेवढा निधी महापालिकेकडे नाही.त्यासाठी पीपीपी मॉडेल केले होते त्यास सभागृहाने मान्यता दिली आहे.यात प्राव्हेट ऑपरेटर काम करण्यास येणार आहे.त्या संबधीचा अभ्यास व बिल्डींग कागदपत्र तयार करायचे त्यासाठी केंद्र शासनाने १.२ कोटी जे दिले होते त्यातूनच क्रिशलचे काम चालू आहे ते देखिल वेगळे टेंडर होणार असून क्रिशलने काय काम केले त्याचा अहवाल सभागृहात मांडणार आहोत. डिस्ट्रीब्युशनचे काम देखिल होणार आहे.

श्री.सय्यद खुसरो :पॅरलल लाईन कशी व कोणत्या जागेवर टाकत आणणार आहे.

कार्य.अभियंता- ब व क : भुसंपादनासाइी बजेट मध्ये ४.५० कोटी तरतूद आहे जागेच्या संदर्भात रस्ते विकास महांमडळाच्या संपर्कात आहोत. रस्त्याच्या कडेला मान्यता दिली होती तांत्रिक अडचणीमूळे थांबलेले आहे जमिनी खालून की रस्त्याच्या कडेला टाकायची प्रोसेसमध्ये आहे. वर्कीग सर्वे एजन्सी फिक्स झाल्यावर काम चालू होईल.

श्री.गजानन बारवाल : केंव्हा सुरू होईल.

श्री.संजय जोशी : डिस्ट्रीब्युशन लवकर करावे.

मा.महापौर :समांतर जलवाहिनी टाकण्यासाठी प्रशासनाने तातडीने पावले उचलावी काम सुरू करता येईल अशी कार्यवाही करावी.डिस्ट्रीब्यूशन लाईन होणे सुध्दा आवश्यक आहे त्या संबधीही कार्यवाही करावी.केंद्र शासनाचा निधी आलेला आहे तो खर्च व्हावा यासाठी त्वरेने टेंडर प्रोसेस करून कार्यवाही करावी.

**विषय क्र.५३४ :**

दिनांक १७.०६.२००९ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणे.

मा.महापौर : इतिवृत्त कायम करण्यास मंजूरी देण्यात येते.

**ठराव :**

दिनांक १७.०६.२००९ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणेस मान्यता देण्यांत आली.

**विषय क्र.५३५ :**

सन १९९९-२००० ते सन २००५-२००६ पर्यंतच्या लेखा परिक्षण अहवालावर विचार विनिमय करणे.

**संवाद :**

श्री.गजानन बारवाल :हा विषय मोठा आहे यावर विशेष सभेचे आयोजन करावे त्यात हा विषय घ्यावा. नंतर बैठक लावावी.

मा.महापौर :हा महत्वाचा विषय आहे.सर्वसाधारण सभेपूढे लेखा परीक्षण अहवाल येतो ही पहिली महापालिका आहे याचा अहवाल शासनाकडे पाठवायचा आहे

श्री.गजानन बारवाल :या अहवालात गंभीर मुद्दे आहे त्यावर सविस्तर चर्चा करावी लागणार आहे समायोजनची मोठी रक्कम बाकी आहे ७०० धनादेश वटवले गेले

नाही. सोक्षमोक्ष चर्चा होवून प्रत्येक मुद्यावर विभागावर चर्चा व्हावी त्यासाठी विशेष सभा बोलवावी.

श्री.प्रशांत देसरडा :या अहवालातील अनेक अक्षेप यातून वगळले गेले आहे त्याची यादी आज दिली.सभागृह नेता यांची भावना लक्षात घेता योग्य निर्णय घ्यावा.

सौ.लता दलल :यात गंभीर असे मुद्ये आहे त्यावर चर्चा करण्यासाठी वेळ पुरेसा नाही त्याकरीता विशेष सभेचे आयोजन करावे.

मा.महापौर :सभागृहाची भावना लक्षात घेता स.सदस्यांनी विनंती केल्यानुसार हा विषय स्थागित ठेवण्यात येतो यावर चर्चा करण्यासाठी विशेष सभेचे आयोजन करण्यात येईल.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तुत प्रस्ताव स्थगित ठेवणेस मान्यता देण्यांत आली. तसेच प्रस्तुत प्रस्तावावर चर्चा करण्यासाठी विशेष सभेचे आयोजन करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यांत आली.

**<u>विषय क्र.५३६ :</u>**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, इंटरनॅशनल फेडरेशन ऑफ बॉडी बिल्डींग अँड फिटनेस (माद्रिद,स्पेन) यांच्या मान्यतेने आणि इंडीयन बॉडी बिल्डींग अँड फिटनेस फेडरेशन, महाराष्ट्र बॉडी बिल्डर्स असोसिएशन व औरंगाबाद जिल्हा हौशी शरीरसौष्ठव पटु संघटनेच्या संयुक्त विद्यमाने मि.एशिया २००९ या ४३ आशीया अंतरराष्ट्रीय शरीरसौष्ठव स्पर्धा औरंगाबाद येथे दि.२४ ते २७ जुलै २००९ या कालावधीत आयोजीत करण्यात आली आहे. भारतात प्रथमच महाराष्ट्रातील औरंगाबाद शहरात मि.एशिया २००९ ही मानाची ४३ वी आशीयाई आंतरराष्ट्रीय संधी प्राप्त झाली आहे. या स्पर्धेत आशिया खंडातील सुमारे ४० देशामधून ४०० शरीरसौष्ठव पटु व १०० अंतरराष्ट्रीय व परदेशी पदाधिकारी प्रामुख्याने उपस्थित राहणार आहे. अंतरराष्ट्रीय पातळीवर अत्यंत प्रतिष्ठेची व व्यापक स्वरूपाची ही स्पर्धा औरंगाबाद येथे होणे ही एक महत्वाची तसेच अभिमानाची बाब आहे. ही स्पर्धा तोलामोलाची होणे तसेच आपले शहर आपले राज्य आणि आपल्या देशाची प्रतिष्ठा अंतरराष्ट्रीय पातळीवर राखली जाणे आवश्यक आहे. अंतरराष्ट्रीय दर्जाची ही स्पर्धा एवढ्या मोठ्या प्रमाणात आयोजीत करणे ही अत्यंत खर्चीक गोष्ट आहे.या मोठ्या प्रमाणात अंतरराष्ट्रीय स्पर्धा ऐतिहासीक औरंगाबाद शहरात प्रथमच होत आहे.या स्पर्धेमूळे शहराची मान उंचावून स्पर्धा पाहण्याचा क्रिडा रसिकांना सुवर्णयोग प्राप्त झालेला आहे.

करीता सदरील स्पर्धा व यासाठी आवश्यक असलेली तरतूद अर्थसंकल्पात ठेवण्यात यावी. यासाठी प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजूरीस्तव सादर.

सुचक : श्री.गजानन बारवाल,डॉ.भागवत कराड,श्री.अब्दुल साजेद अब्दुल सत्तार

अनुमोदक : श्री.संजय शिरसाट,श्री.संतोष जेजुरकर,श्री.संजय जगताप

**<u>संवाद :</u>**

श्री.संतोष जेजूरकर :बॉडी बिल्डींग मि.एशिया अशी स्पर्धा ही भारताला मिळाली याचा गौरव पाहिजे मुंबई पुणे येथे व्हावी यासाठी प्रयत्न झाले.परंतु सचीव श्री.संजय मोरे यांनी ही स्पर्धा औरंगाबाद मध्ये घेण्याचे ठरवले ही स्पर्धा या शहरासाठी मिळाली औरंगाबाद शहराला मोठा मान मिळालेला आहे महापालिकेच्या वतीने यास जास्तीत जास्त निधी उपलब्ध करून दयावा.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : ज्या दिवशी मा.मुख्यमंत्री आले होते, मुस्लीम साहित्य संमेलनासाठी रू.५.०० लक्ष देण्याबाबत चर्चा झाली होती, कार्यक्रमांला मा.मुख्यंमत्री व आपणही होते. त्यांनाही ५ लक्ष देण्यात यावे.

श्री.गजानन बारवाल :मा.सभापती यांनी सूचना केली, विषय समजला नाही ५ लक्ष कशासाठी पाहिजे.

मा.महापौर : या समेंलनासाठी मदत करावी असे त्यांनी मला म्हटले होते.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : मी यात सुचक आहे या स्पर्धेसाठी ५ लक्ष तसेच मुस्लीम उर्दु साहित्य समेंलनासाठीही ५ लक्ष देण्यात यावे.

श्री.प्रशांत देसरडा नागपूर महापालिकेत अशाच पध्दतीच्या मदत देण्याच्या प्रकरणात चौकशी झाली सदस्यांवर कार्यवाहीची वेळ आली अशी रक्कम देता येते का?

श्री.गजानन बारवाल मि.एशिया स्पर्धा जर औरंगाबादला होत असेल तर मदत करणे योग्यच आहे कायदेशीर बाबी स्पष्ट कराव्या १० लक्ष मंजूर करावे.

श्री.भगवान घडमोडे :पाणी,विद्युत,रस्ते या सुविधा देणे महापालिकेची प्राथमिक जबाबदारी येते. असे ठराव मंजूर करून इतर काही महापालिकेत नगरसेवकावर कार्यवाही झाली ठराव ठेवतांना स्पर्धेचे नाव रक्कम, संस्थेचे नाव प्रमाणपत्र योग्य की नाही हे ठरावातून बोध होत नाही विकास कामासाठी निधी नसल्याचे उत्तर मिळते यासाठी रक्कम कोठून देणार आहे

श्री.गजानन बारवाल :सर्व प्रकारच्या जबाबदा-या महापालिकेवर असतात.मदत करण्या बाबत विचार व्हावा.

श्री.भगवान घडमोडे विचार करावा परंतु असे ठराव येवू नये अशा कामासाठी अनेक मदत करतात महापालिका लहान आहे.सर्व माहिती घेवून हा ठराव घ्यावा.

श्री.गजानन बारवाल :१.५० ते २.०० कोटी खर्च लागणार आहे. २१ लक्षची मागणी केली असली तरी काहीना काही तरी मदत केली पाहिजे आतापर्यत राज्यस्तरीय स्पर्धा झालेल्या आहे ही एशियाई स्पर्धा आहे यामूळे या शहराचे नाव मोठे होणार आहे. त्यांनी २१ लाख म्हटले असले तरी आपण १० लाख द्यावे.

श्री.हिम्मतराव दाभाडे :महापालिकेकडे निधी नाही म्हणून विकास कामे होत नाही आर्थीक परीस्थिती चांगली नसतांना अशा कामासाठी रक्कम देणे योग्य नाही प्रस्ताव मंजूर करू नये.

मा.महापौर : आताच सभागृह नेता यांनी सांगितले की, अतिशय मोठी अशी ही आशियाई स्तरावरील स्पर्धा या शहरात होत आहे. आपण मदत केली पाहीजे अशी त्यांनी भावना व्यक्त केली, त्यांचे भावनेची कदर करतो आहोत. यापूर्वीही ज्या ज्या स्पर्धा झाल्या त्यांना महानगरपालिकेने भरघोस मदत केली आहे. त्यावेळी आर्थिक परिस्थिती होती. देणे शक्य होते मदत केली परंतू यावर्षी महापालिकेची परिस्थिती बघता हे अवघड आहे. तरीही ही आशियाई स्तरावरची स्पर्धा असल्यामूळे कूठेतरी या सर्वांचा समतोल साधणे आवश्यक आहे. जसे विकास कामांना पैसा नाही तो असला पाहीजे विचार करतो तसेच ही आशियाई स्तरावरील स्पर्धा असल्यामूळे विचार करणे आवश्यक आहे. म्हणून या स्पर्धाकरीता महानगरपालिकेच्या वतीने ३ लक्ष व या सोबतच स.सभापती यांनी म्हटले की, मधल्या काळात मा.मुख्यमंत्री यांचे सोबत चर्चा झालेली होती आणि मराठी मुस्लीम साहित्य संमेलनास मदत

करण्याचे सांगितले होते, त्यानुसार त्यासाठी १ लक्षची आर्थिक मदत करण्यांत येते, यावर प्रशासनाने नियमानुसार कार्यवाही करावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार इंटरनॅशनल फेडरेशन ऑफ बॉडी बिल्डींग अँड फिटनेस (माद्रिद,स्पेन) यांच्या मान्यतेने आणि इंडीयन बॉडी बिल्डींग अँड फिटनेस फेडरेशन, महाराष्ट्र बॉडी बिल्डर्स असोसिएशन व औरंगाबाद जिल्हा हौशी शरीरसौष्ठव पटु संघटनेच्या संयुक्त विद्यमाने मि.एशिया २००९ या ४३ आशीया अंतरराष्ट्रीय शरीरसौष्ठव स्पर्धा दि.२४ ते २७ जुलै २००९ या कालावधीत आयोजीत करण्यांत आली असल्यामूळे, या स्पर्धेसाठी रू.३.०० लक्ष आणि मराठी मुस्लीम साहित्य संमेलनास रू.१.०० लक्ष आर्थिक मदत करण्याच्या दुरूस्तीसह सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.५३७ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वॉर्ड क्र.९८ मधील महानुभाव आश्रम परिसरात मंदिराकडे जाणाऱ्या रस्त्यावर पेव्हर ब्लॉक बसविण्यात यावेत. सदरील कामाचे अंदाजपत्रक मंजूर असून झालेल्या कामाच्या बचतीच्या रक्कमेतून हे काम प्रस्तावित करण्यात येत आहे. तरी महानुभाव आश्रम परिसरात मंदिराकडे जाणाऱ्या रस्त्यावर पेव्हर ब्लॉक बसविणेबाबतचा प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

सुचक : सौ.अनिता नंदकुमार घोडेले		अनुमोदक : श्री.गजानन बारवाल

मा.महापौर		: विषय मंजूर करण्यांत येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.९८ मधील महानुभाव आश्रम परिसरात मंदिराकडे जाणाऱ्या रस्त्यावर पेव्हर ब्लॉक बसविण्यास तसेच सदरील काम हे मंजूर असलेल्या अंदाज पत्रकातील बचतीच्या रक्कमेतून करणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते,वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.५३८ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, विषय क्र.२१७/२८ दिनांक ०४.०२.२००० रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेत मुकूंदवाडी गृह निर्माण संस्था,औरंगाबाद या संस्थेस महानगरपालिकाकडे सर्वे नं.५६ मधून पर्यायी जागा देण्याकरीता उपलब्ध नसल्याने संस्थेची जागा आरक्षणातून वगळल्या बाबतच्या प्रस्तावास मंजूरी देण्यात आलेली आहे. परंतू सदरील जागेचे भूसंपादन महानगरपालिकेने केले असल्यामूळे ठराव क्र.२१७/२८ दिनांक ४.२.२००० च्या सर्वसाधारण सभेत मंजूर करण्यांत आलेला प्रस्ताव रद्द करण्यात यावा. करीता प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

सुचक : श्री.गजानन रामकिशन बारवाल		अनुमोदक : श्री.संजय शिरसाट

**संवाद :**

श्री.भगवान घडमोडे	: प्रस्तावाची सविस्तर माहिती दयावी.

श्री.संजय सिरसाट	: कोकणवाडी भागात एमएसईबीचे ड्रम प्रोजेक्टचे नियोजन असून जागा दयायची आहे यापुर्वी ठराव झाला तो रद्य करावा यास मंजूरी दयावी ड्रम प्रोजेट ही योजना मोठी असून त्यांनी डिमांड मागविलेली आहे. आलेला फंड सुध्दा परत जाण्याची शक्यता आहे त्यांना जागा देता यावी म्हणून रद्द करावा व ताबडतोब त्यांना जागा देण्यांत यावी.

श्री.गजानन बारवाल	: महापालिकेकडे एमएसईबीचे थकीत रक्कम आहे ड्रम प्रोजेक्टसाठी जागेची मागणी केली महापौर दालनात बैठकीत सर्व अधिकारी पदाधिकारी हजर होते सविस्तर माहिती ठेवली होती प्रोजेक्ट समजून

घेवूनच हा विषय ठेवलेला आहे जागा देणे योग्य आहे जी लाईट बिलापोटी महापालिकेकडे रक्कम आहे त्यातून ही रक्कम वजा करण्यात संबधीत विभाग तयार आहे तसे त्यांनी पत्र पण दिले आहे.

श्री.वसंत नरवडे :यासाठी किती खर्च लागणार.पुर्वी जागा दिली हस्तांतर केले कशासाठी केले ९ वर्षानंतर हा प्रस्ताव कशासाठी आला खुलासा घ्यावा.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर : २१७ ठराव काय व कुणी ठेवला होता ९ वर्षानंतर पुन्हा पर्यायी जागा देण्या संदर्भात ठराव येतो माहिती घ्यावी प्रस्ताव प्रशासनाकडून यायला पाहिजे.

श्री.संजय सिरसाट :ही जी जागा आहे या प्रस्तावामध्ये स्पष्ट म्हटले आहे जागा महापालिकेने भुसपादीत केली मुकूंदवाडी गृह निर्माण संस्था जागेची मागणी करीत होती ती त्यांना देवू नये.महापालिकेची जागा ड्रम प्रोजेक्टसाठी एमएसईबीला दयायची आहे यामूळे १०-१५ वार्डामध्ये लोंडशेडींग किंवा लाईटच्या बाबतीत नागरीकांना अडचणी येणार नाही.जागेचे मुल्य एमएसईबी देण्यास तयार आहे महापालिका व एमएसईबी यांचेत हा व्यवहार आहे.त्यामूळे ही कार्यवाही करण्यात यावी पैश्याचे काय ते प्रशासनाने ठरवावे.

श्री.गजानन बारवाल महापालिकेकडे विदयुत बिल थकीत आहे त्यातून ही रक्कम वजा करावी.

श्री.वसंत नरवडे :प्रशासनाने खुलासा करावा माहिती नसेल तर तुर्त स्थगित ठेवावे पुढील सभेत घ्यावे.

श्री.संजय सिरसाट :मुकूंदवाडी गृह निर्माण संस्थेने पर्यायी जागा देण्या संबधी ठराव दिला होता पर्यायी जागा उपलब्ध नसल्यामूळे संस्थेची जागा आरक्षण वगळण्याचा बाबतीतला प्रस्तावास मंजूरी देण्यात आली असे या ठरावात म्हटलेले आहे.परंतु सदरील जागेचे भुसंपादन महापालिकेने केले असल्यामूळे व जो २००० साली ठराव झाला त्याची अमलबजावणी झाली नाही ६ महिण्यात कार्यवाही होणे अपेक्षीत असते कामात अडथळा येवू नये.त्यासाठी मंजूरी दयावी जनतेच्या हिताचा प्रश्न आहे वैयक्तिक मालकाला जागा दयायची नाही.एमएसईबीने विनंती केली की वेळेत प्रोजेक्ट केला नाही तर निधी परत जाण्याची शक्यता आहे.रक्कम देणे-घेणे बाबत प्रशासन ठरविल हा प्रस्ताव मंजूर करावा.

श्री.वसंत नरवडे :सविस्तर माहिती या प्रस्तावा विषयी देण्यात यावी.

श्री.भगवान घडमोडे : एमएसईबीने जागेची मागणी केली दखल घेतली नाही संबधीत अधिका-यावर कार्यवाही करावी.प्रशासनाचे काम नगरसेवकांना करावे लागते हे योग्य नाही ठराव रद्य करण्याची वेळ का आली सर्वे नं ५६ कुठे आहे

कार्य.अभियंता-(ई व फ) :या प्रस्तावाच्या अनुशंगाने भुसंपादनाची कार्यवाही पुर्ण झाली आहे त्यांचा अवार्ड पण डिक्लेर झाला महापालिकेच्या नावावर पीआर कार्ड आहे पजेशनला मा.उच्च न्यायालयाची १९९४ स्थगिती आहे. २१७ हा अशासकीय ठराव आहे.ती जागा आरक्षणामध्ये जाते म्हणून सर्वे नंबर ५६ मधील पर्यायी जागा देण्याचा ठराव आहे.(दिं.४-२-२००० च्या बैठकीतील ठराव क्र. २१७ वाचून दाखवितात.)

श्री.अ.साजेद अ.सत्तार :प्रशासकीय प्रस्ताव मागवावा.

श्री.अ.रशिद खान :ठराव क्र.२१७ मंजूर केला त्यावेळी चर्चा झालेली होती का.

कार्य.अभियंता-(ई व फ): त्यावेळी या विषयावर चर्चा झालेली नाही.

श्री.अ.रशिद खान मामू :चर्चा न होता मंजूर केले बघीतले नाही शासनाकडे पाठविले होते का?

श्री.संजय सिरसाट :चर्चा झाली असेल नसेल पुर्वीचा प्रस्ताव रद्द करण्याची मागणी केली आहे.ती जागा जी होती ती उदयानसाठी आरक्षीत होती.सर्व पाठपुरावा करून शासनाकडे पाठविले आहे शासनाने उदयानचे आरक्षण रद्द करून ते ड्रम प्रोजेक्टसाठी ही जागा आरक्षीत करावे असे शासनाचा जीआर आहे.

श्री.अ.साजेद अ.सत्तार :शासन जीआरचा यात उल्लेख नाही प्रशासकीय प्रस्ताव मागवावा.

मा.महापौर :पुर्वीच्या प्रस्तावास अनुसरून ठेवलेल्या प्रस्तावाची माहिती दयावी.

श्री.संजय सिरसाट :यापुर्वी प्रशासनाचा प्रस्ताव आलेला आहे परंतू काम होत नाही म्हणून हा प्रस्ताव ठेवला जनतेच्या हिताचे काम आहे यात गैरव्यवहार किंवा आर्थीक व्यवहाराचा संबध नाही

श्री.वसंत नरवडे :आर्थीक व्यवहाराबाबत संशय नाही प्रस्ताव ठेवणे प्रशासनाचे काम आहे तसा प्रस्ताव यावा.

श्री.अ.साजेद अ.सत्तार :प्रशासकीय प्रस्ताव मागवावा.

श्री.संजय सिरसाट :प्रशासनाने प्रस्ताव दिला होता तो मंजूरही झाला.

श्री.भगवान घडमोडे :प्रशासनाने याची दखल का घेतली नाही.

मा.महापौर :ड्रम प्रोजेक्टसाठी जागा दयायची शहराच्या विकासाचा एक भाग आहे. एमएसईबीने महापालिकेकडे पत्रव्यवहार केला का ?

श्री.अ.साजेद अ.सत्तार :या बाबतची संचिका प्रशासनाकडे आहे का ?

श्री.वसंत नरवडे :यात मा.न्यायालयाचे स्थगिती आदेश आहे प्रशासकीय प्रस्ताव यावा.

श्री.भगवान घडमोडे :कोर्ट मॅटर असेल तर आमचा विरोध आहे.आपणा सर्वांवर कार्यवाही होवू शकते.

श्री.रेणुकादास वैद्य :या जागेच्या संदर्भात प्रकरण न्यायप्रविष्ठ असेल तर चर्चा करणे योग्य नाही.माहिती घ्यावी.

श्री.संजय सिरसाट :मुकूंदवाडी गृह निर्माण संस्था म्हणजे मुकूंदवाडीत जागा नाही कोकणवाडीमध्ये जागा आहे.

मा.महापौर :मा.न्यायालयात प्रकरण आहेका,जागा कोठे आहे याचा खुलासा करावा.

श्री.भगवान घडमोडे :ड्रम प्रोजेक्ट मूळे अनेक रस्ते खराब झाले.

श्री.संजय सिरसाट :यात वार्डाचा विकास होतो कुणी विरोध करणार असेल तर आम्ही त्यांचे विरोधात आहोत.यास मंजूरी दयावी.

श्री.हिम्मतराव दाभाडे :माधव घोरपडे यांची जागा घेतली त्यांना पर्यायी जागा देण्याचा निर्णय झाला परंतु त्यांना जागेचा मोबदला व जागाही देण्यात आले असे निर्णय घेत असेल तर योग्य नाही.

श्री.संजय सिरसाट :पुन्हा मत मांडतो योग्य तो निर्णय घ्यावा.हा प्रस्ताव मागिल वेळेस प्रशासनाने सर्वसाधारण सभेसमोर मांडला होता,औरंगपूरा, ज्योतीनगर तसेच कोकणवाडी अशा ३ ठिकाणी ड्रम प्रोजेक्टसाठी जागा निवडल्या होत्या त्यातील ही एक जागा देण्याचे कबूल केले होते.या संदर्भात एमएसईबीच्या अधिकाऱ्यासमवेत मा.आयुक्त मा.महापौर दालनात बैठका

झाल्या जागेचे रेडीरेकनरनुसार दर व्यवहार कसे होणार या संदर्भात पत्रव्यवहार झाले मुळ मालक यांनी मा.न्यायालयात या विषयी प्रकरण दाखल केले.या जागेचे आरक्षण हे उदयानसाठी असल्यामूळे त्यात बदल करता येणार नाही.म्हणून ही जागा एमएसईबीला देता येणार नाही.नंतर प्रशासनाने याचा पाठपूरावा केला शासनाकडे विनंती केली आरक्षणात बदलकरून आणला उद्यानचे आरक्षण काढून तीजागा ड्रम प्रोजेक्टसाठी दयावी असे आरक्षण टाकले.६-८ महिण्यापासून हा प्रश्न रेगांळतो. ज्यांचेमूळे स्टे झाला तो व्हॅकेट व्हावा म्हणून एमएसईबी मा.न्यायालयात अप्रोच झाले.लिगली काही घडू नये म्हणून जो प्रस्ताव पुर्वी झाला त्यावर ६ महिण्याच्या आत कार्यवाही झाली असती तर ग्राहय धरता आले असते सदर प्रस्ताव अशासकीय होता कार्यवाही झाली नाही म्हणून चांगल्या कामाला गती मिळण्यासाठी हा प्रस्ताव ठेवला यानंतर डिमांड नोटीस जाईल.मा.न्यायालयाचे स्थगिती आदेश मिळेल तेंव्हा जागा संपादीत होईल.महापालिका व एमएसईबी दोन्ही विभाग न्यायालयात ॲपीयर झालेले आहे.यामूळे शहराचा विकास होईल त्या भागात लाईटच्या बाबतीत अडचणी येणार नाही जागा देणे गरजेचे आहे अनेक वेळा त्या जागेवर अतिक्रमण झालेले काढले. मंजूर केल्यास डिमांड नोटीस जाईल व पुढील कार्यवाही होईल हा ठराव मंजूर करावा जागेची डिमांड नोटीस दयावी.चांगल्या कामास सहकार्य करावे.

श्री.अ.साजेद अ.सत्तार :या प्रस्तावाला विरोध नाही परंतू प्रशासकीय प्रस्ताव यावा.

श्री.वसंत नरवडे :सन २००० मधील ठराव आहे शासनाने या बाबतीत काय निर्णय दिला. कोणत्या ॲक्टीव्हिटीज झाल्या सविस्तर माहिती घ्यावी. प्रशासकीय प्रस्ताव यावा.

मा.महापौर :या विषयावर सविस्तर अशी चर्चा झाली परंतू इतर काही सदस्यांनी या प्रस्तावास विरोध नाही असे म्हटले ज्या तळमळीने स.सदस्यांनी हा प्रस्ताव मांडला ड्रम प्रोजेक्टला जागा दयायची हे जरी सत्य असले तरी सभागृहाचे असे मत आहे की, हा प्रस्ताव अधिक माहितीसह सविस्तर आला असता तर योग्य झाले असते. हीच माहिती घेवून हा प्रस्ताव प्रशासनाने ताबडतोब पुढील बैठकीत सादर करावा.

श्री.संजय सिरसाट :पुर्वीचा प्रस्ताव रद्य करण्या बाबत प्रस्तावात असावे तशा पध्दतीचा प्रस्ताव यावा.

श्री.गजानन बारवाल :प्रशासनाने लवकरात लवकर प्रस्ताव ठेवावा.असे आदेशीत करावे

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर :२१७ क्रमांकाचा ठराव काय होता व तो कुणी ठेवला होता याची पण माहिती दयावी.

मा.महापौर :प्रशासनाच्या प्रस्तावात ही सर्व माहिती यावी.

श्री.वसंत नरवडे :नगररचना विभागाकडे ज्या ज्या प्रकरणात माहिती मागविली ती ताबडतोब दिली पाहिजे जसे आताच मागिल ठरावाच्या वेळेत आली ज्याप्रकरणात इन्ट्रेस आहे त्याची माहिती दिली जाते उर्वरीत प्रकरणाची माहिती दिली जात नाही त्यामूळे अनेक कामे थांबून आहे विकासाची कामे अडकलेली आहे.

मा.महापौर	:जे विषय असतात त्यांचे बाबतीत संचिका उपलब्ध होत नाही प्रत्येक सर्वसाधारण सभेच्या वेळेपर्यत विचारलेली माहिती स.सदस्यांपर्यत पोहचेल याची व्यवस्था करावी.

**ठराव :**

प्रस्तुत प्रस्तावासंबंधी प्रशासनाने सविस्तर माहितीसह पूढील बैठकीत प्रस्ताव ठेवणेस मान्यता देण्यांत आली.

**विषय क्र.५३९ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की,जालनारोड ते इंदिरानगर,बायजीपुराहा ६० फुटी रस्ता गेल्या पंधरा वर्षापासून प्रलंबीत असून मा.साहेबांनी या रस्त्याचा त्वरीत विचार करून हा रस्ता लवकरात लवकर तयार करावा. सध्या हा रस्ता लक्ष्मी कॉलनी पर्यंत आलेला असून, त्यापूढे असलेल्या नागरीकांच्या लिगल प्रॉपर्टीज असून बिना शर्त रस्त्यासाठी जागा देण्यास तयार आहे.

या रस्त्यावर ४६ दवाखाने असून ॲपेक्स हॉस्पीटल हे मोठे हॉस्पीटल आहे. या ॲपेक्स हॉस्पीटलमध्ये संपूर्ण मराठवाड्यातून रूग्ण येतात. त्यांना व त्यांच्या नातेवाईकांना जाण्या येण्याचा भयंकर त्रास होत आहे.

तरी सदरहू जालना रोड ते इंदिरानगर,बायजीपुरा हा प्रलंबीत ६० फुटी रस्ता तयार करण्यासाठी या वर्षीच्या आर्थिक वर्षात तरतूद करण्यात यावी, ही विनंती.

सुचक : श्री.कैलास गायकवाड		अनुमोदक : श्री.प्रशांत देसरडा

**संवाद :**

श्री.वसंत नरवडे पाटील: नगर रचना प्रकरणांत जशी माहिती तशी सर्व प्रकरणात यावी. अनेक प्रश्न पडले आहे.

मा.महापौर	: सर्व विषयात माहिती द्यावी.

श्री.कैलास गायकवाड	: डेव्हलपमेंन्ट प्लॅन मधील हा एक महत्वाचा रस्ता आहे.या रस्त्याच्या लगत४६ हॉस्पीटल आहे.जळगाव व इतर भागातील नागरीकांना ॲपेक्स हॉस्पीटलमध्ये यायचे झाल्यास उडाणपूल आकाशवाडी सिग्नलमार्गे यावे लागते हा रस्ता उड्डानपूल ते जकातनाका यास पॅरललरोड असल्यामूळे हा रस्ता विकसीत केल्यास जालना रोडची वाहतूक कमी होईल. व अपघातही होणार नाही.या रस्त्यामध्ये बाधीत होणाऱ्या काही मालमत्ता धारकांना जागेचा मोबदलाही दिला २५ मिळकतधारकांना मोबदला देवून हा रस्ता करणे आहे.ती कार्यवाही ताबडतोब व्हावी विषय मंजूर करावा.

मा.महापौर	:हा विषय मंजूर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, जालना रोड ते इंदिरानगर,बायजीपुरा हा प्रलंबीत ६० फुटी रस्ता तयार करण्यासाठी या वर्षीच्या आर्थिक वर्षात तरतूद करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.५४० :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, भडकल गेट येथील औरंगाबाद म.न.पा.केंद्रीय प्राथमिक शाळा ज्युब्ली पार्क या शाळेच्या मैदानात महाकवी "वामन दादा कर्डक" यांचा पुर्णाकृती पुतळा बसविण्यांत यावा. सदरील पुतळा बसविण्याचे कामास तथा येणारा खर्चासह मंजूरी मिळण्यासाठी प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजूरीस्तव सादर.

सुचक : श्री.हिम्मतराव एस.दाभाडे

अनुमोदक : १.श्री.अ.साजेद अ.सत्तार,२.श्री.के.व्ही.मोरे,३.सौ.मंगला प्रकाश गायकवाड

<u>**संवाद :**</u>

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर : हैद्राबाद धरतीवर सर्व पुतळे एकाच ठिकाणी उभारण्याचा मानस होता. नवीन जे पुतळे करणार आहे ते एकाच ठिकाणी असावेत. अण्णाभाऊ साठे यांचा पुतळा बरोबर दिसत नाही शहरातील इतर पुतळयाप्रमाणे दिसेल असा पुतळा करण्याचा विचार करावा या प्रस्तावास मंजूरी दयावी.

श्री.अ.रशिद खान : औरंगाबाद शहराचा सर्वे करावा. पुतळे करण्यासाठी जागा कुठे आहे आजपर्यंत असे किती ठराव झाले शहरात किती पुतळे याची सदस्यांना प्रत दयावी. जेथे पुतळा उभारण्यासाठी जागा असायला पाहिजे जागेचा सर्वे करावा मागिल काळात या संदर्भात कमेटी करण्यात आली होती. पुतळा बसविण्यात आलेल्या व्यक्तीचे कार्य पुतळ्याजवळ लिहावे. ज्यांची मुले जिवंत आहे ते करत नाही. महानगरपालिकेवर जबाबदारी येते. पुतळा खराब,त्यावर घाण झाल्यास साफ करण्याची जबाबदारी संबधीतावर सोपविली पाहिजे. कमेटी करावी. आजपर्यंत किती पुतळे झाले, ठराव झाले, त्याबाबत योग्य निर्णय घ्यावेत.

डॉ.भागवत कराड :वामन दादा कर्डक यांचा पुतळा होणेसाठी अनेकांची मागणी आहे. ज्युब्ली पार्क येथे पुतळा उभारावा म्हणून ठराव पारीत झाला परंतु प्रशासनास अडचण आली असे समजते त्याचा खुलासा घ्यावा.ज्युब्ली पार्क चौकात हा पुतळा करावा. २००७ मध्ये प्रस्ताव मंजूर आहे.

श्री.सतिष कटकटे : हा प्रस्ताव रद्द करावा.

सौ.लता दलाल :यांचे विषयी आम्हाला आदर आहे परंतु प्रस्ताव चुकीच्या पध्दतीने मांडला शाळेच्या आवारात पुतळे बसविण्याचे प्रस्ताव यापूढे येवू नये त्यांना लहान करू नये. शाळेच्या मैदानास बसविण्या ऐवजी मोठया चौकात हा पुतळा व्हावा अशी माझी मागणी आहे. शाळांत पुतळे बसविणे बंद करावे.

मा.महापौर :महाकवी वामन दादा कर्डक यांचा पुतळा व्हावा सभागृहाची भावना आहे त्या भावनेचा आदर आपण केला पाहिजे.याचा पुतळा बसविण्याचा ठराव यापूर्वी पारीत करण्यात आला यावर प्रशासनाने कार्यवाही करावी.आताच सदस्यांनी भावना व्यक्त केली की अनेक पुतळे चौकात व इतर ठिकाणी बसविले जातात परंतु त्याकडे लक्ष दिले जात नाही. सर्व महापुरूषांचे पुतळे आपल्याला वंदनीय आहे.एकाच ठिकाणी पुतळे असावे ते मोठे पार्क असावे यावर अनेकदा चर्चा झाली परंतु एकमत होत नाही.या बाबतीत जेष्ठ सदस्य व इतरांनी एकत्रित येवून पुतळे एकाच ठिकाणी बसविण्या बाबतचा योग्य निर्णय घेतला पाहिजे या बाबतीत एक धोरण ठरवले पाहिजे.इतर विषयात मार्ग निघतो यातही मार्ग सभागृहाने काढावा.

श्री.कचरू मोरे :जेंव्हा दलिताचे पुतळे बसवायचे ठराव येतात त्यावेळी एकमत होत नाही. यापूर्वी माजी महापौर डॉ. भागवत कराड यांनी अनेक ठिकाणी पुतळे बसविण्याचे उदघाटन केले तेथे पुतळेही झाले.

सौ.लता दलाल :या बोलण्यावर आमचा अक्षेप आहे दलित हिन्दू असा प्रश्न नाही थोर पुरूषाचा अपमान होतो.

मा.महापौर :महाकवी वामन दादा कर्डक हे सर्वांना वंदनीय आहे त्याचा पुतळा बसविण्याचा ठराव यापूर्वीच मंजूर झालेला आहे सभागृहात वाद निर्माण होईल असे भाष्य सदस्यांनी करू नये.सर्वांच्या सहकार्याने चांगले निर्णय घेता येतात.

श्री.हिम्मतराव दाभाडे :पुर्वी ठराव मंजूर झाला परंतु कुठे बसवावा जागा निश्चित केली नाही याचा खेद वाटतो.यावर काय निर्णय दिला.

मा.महापौर : यापूर्वी वामन दादा कर्डक यांचा पुतळा उभारण्या बाबत ठराव पारीत झालेला आहे त्या नुसार प्रशासनाने कार्यवाही करावी जागेच्या बाबतीत एकत्रित बसून धोरण ठरवावे. योग्य ठिकाणी हा पुतळा उभारण्याची कार्यवाही करावी.

**ठराव :**

प्रस्तुत प्रस्तावासंबंधी वामन दादा कर्डक यांचा पुतळा उभारण्याबाबत यापूर्वी पारीत झालेल्या ठरावानुसार प्रशासनाने कार्यवाही करावी,तसेच जागेच्या बाबतीत एकत्रित बसून धोरण ठरविणेस आणि योग्य ठिकाणी पुतळा उभारणेची कार्यवाही करणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

## पुरवणी विषय पत्रिका

**विषय क्र. ५४१ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, बसैय्येनगर बायजीपुरा येथे महानगरपालिकेतर्फे व्यायाम शाळा बांधण्यात आली आहे. तरी सदरील व्यायाम शाळेस स्व.लक्ष्मणराव शिवराम गायकवाड यांचे नांव देण्यांत यावे. करीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजूरीस्तव सादर.

सुचक : श्री.प्रशांत देसरडा

अनुमोदक : श्री.शशांक विसपुते, श्री.कैलास गायकवाड, श्री.सरला पोळ

मा.महापौर : विषय मंजूर करण्यांत येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, बसैय्येनगर बायजीपुरा येथे महानगरपालिकेतर्फे बांधण्यात आलेल्या व्यायाम शाळेस स्व.लक्ष्मणराव शिवराम गायकवाड यांचे नांव देण्यांस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५४२ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, साहित्यसम्राट लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची दि.१ ऑगस्ट २००९ रोजी जयंती असून या निमित्ताने अण्णाभाऊ साठे फांऊडेशन तर्फे शहरात अण्णाभाऊ साठे फेस्टिव्हल २००९ अंतर्गत विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यांत येणार असून यामध्ये अण्णाभाऊ साठे यांच्या जीवनावरील गीताचा कार्यक्रम, महिलाची रांगोळी स्पर्धा, शालेय मुलांसाठी निबंध स्पर्धा आयोजीत करण्यांत येणार असून या कार्यक्रमासाठी चहापान,पारितोषिक, सन्मानपत्र,हॉल,बॅनर यासाठी येणारा खर्चास आपल्या महानगरपालिकेतर्फे र.रू.१ लाख रूपयाचा निधी देण्यांत यावा, करिता प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजूरीस्तव सादर.

सुचक : श्री.संजय उत्तमराव जगताप अनुमोदक : श्री.किशोर तुलशीबागवाले

**संवाद :**

श्री.सतिष कटकटे : प्रस्तावाचे सूचक अनुमोदक आहेत का?

श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर : असे जे प्रस्ताव येतात त्या बाबतीत पॉलीसी मॅटर ठरवावे, देण्याबद्दल हरकत नाही. परंतू हे महापालिकेतर्फे करावे. कूठल्याही खाजगी संस्थेला देवू नये.

श्री.प्रशांत देसरडा : प्रस्तावाचे सूचक अनुमोदक आहेत का?

श्री.गजानन बारवाल : कूठल्याही संस्थेला अशी रक्कम देवू नये,ज्यावेळेस अशा जयंती, उत्सव असतील ते करण्यासाठी महापालिकेने ठरवावे व योग्य तो निधी खर्च करावा.

श्री.सतिष कटकटे : हा विषय रद्द करावा. प्रस्तावाचे सूचक,अनुमोदक नाही.

मा.महापौर : आता अण्णाभाऊ साठे यांची जयंती येते आहे, ती जयंती महानगरपालिकेच्या प्रशासनाने महापालिकेने साजरी करावी जयंती साजरी करण्यासाठी रू.१.०० लाखापर्यंत जो काही खर्च लागेल, त्या खर्चाला मंजूरी देण्यांत येते.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावाच्या अनुषंगाने व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार साहित्यसम्राट लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची दि.१ ऑगस्ट २००९ रोजी जयंती असल्यामूळे, महापालिका प्रशासनाने अण्णाभाऊ साठे जयंती साजरी करणेस,जयंती साजरी करण्यासाठी रू.१.००लाखापर्यंत येणाऱ्या खर्चास मंजूरी देणे या दूरूस्तीसह सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते,वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. ५४३ :</u>**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, औरंगाबाद शहरातील सिडको परिसरात असलेले कॅनॉट मार्केट अत्यंत वेगाने वाढत आहे. यात मराठी भाषिक व्यापारी जास्त संख्येने असल्याने त्यांचे योगदान जास्त आहे. सदर मार्केटचे नांव उंचावण्यासाठी त्यास छत्रपती शिवाजी महाराज व्यापारी संकुल असे नांव देण्यास तेथील व्यापारी वर्ग आग्रही आहे.

करीता तेथील व्यापाऱ्यांचा आग्रह लक्षात घेता सिडकोतील कॅनॉट मार्केटला छत्रपती शिवाजी महाराज व्यापारी संकुल हे नांव देण्यास प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेत सर्वानुमते मंजूरीस्तव सादर.

सुचक : श्री.गजानन बारवाल,श्री.भागवत कराड,श्री.प्रशांत देसरडा

अनुमोदक : श्री.संतोष जेजुरकर

श्री.गजानन बारवाल : मंजूरी देण्यात यावी.

मा.महापौर : विषय मंजूर करण्यात येतो.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद शहरातील सिडको परिसरात असलेले कॅनॉट मार्केटला छत्रपती शिवाजी महाराज व्यापारी संकुल हे नांव देण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. ५४४ :</u>**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, प्रभाग क्र.३० येथील जिल्हाधिकारी कार्यालय ते शहागंज वाचनालय नसल्याने या परिसरातील वाचन प्रेमी नागरीकांची गैरसोय होत आहे. यासाठी महानगरपालिकेची जागा उपलब्ध नसल्यास जागा भाडे तत्वावर घेवून वाचनालय त्वरीत चालू करावे.

करीता प्रभाग क्र.३० येथील जिल्हाधिकारी कार्यालय ते शहागंज वाचनालय बांधणे होई पर्यंत भाडे तत्वावर जागा घेवून वाचनालय त्वरीत चालू करण्यासाठी प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेत सर्वानुमते मंजूरीस्तव सादर.

सुचक : सौ.शोभा मिटकर,श्री.गजानन रामकिशन बारवाल,सौ.लता दलाल

अनुमोदक : श्री.राजेश व्यास,श्री.बाबासाहेब डांगे,श्री.संतोष खेंडके,सौ.वीणा गजेंद्र सिध्द

**संवाद :**

श्री.गजानन बारवाल : या भागात महानगरपालिकेची जागा नसल्याने ही जागा भाडेने घेवून वाचनालय चालू करावे. हा विषय मंजूर करावा.

मा.महापौर : मंजूरी देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्र.३० येथील जिल्हाधिकारी कार्यालय ते शहागंज भागात महानगरपालिकेची जागा उपलब्ध नसल्याने या भागात वाचनालय बांधणे होई पर्यंत भाडे तत्वावर जागा घेवून वाचनालय सुरू करणेस मान्यता देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५४५ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, सर्वसाधारण सभा दिनांक २३.०६.२००९ रोजी विषय क्र.५०६, एन- ६ स्मशानभूमी ते सेंट्रल नाका व त्यापूढील भागात ३०० एम.एम.व्यासाची डी.आय.के.-९ जलवाहीनी टाकण्यासाठी सुधारीत अंदाजपत्रक ठेवण्यात आले असता यास मंजूरी होवू शकली नाही. तरी सदर काम शहराच्या पाणी पुरवठ्याच्या दृष्टीने अत्यंत आवश्यक असल्याने सदर प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या फेरनिर्णयासाठी ठेवणे योग्य होईल.

करिता सर्वसाधारण सभेत प्रस्ताव सादर करण्यांत येत आहे.

सुचक : श्री.खान मुजीब मिर आलम खान अनुमोदक : श्री.गजानन रामकिशन बारवाल

**संवाद :**

श्री.गजानन बारवाल :याप्रस्तावात मी अनुमोदक आहे.मागिल वेळेस हा प्रस्ताव घाईगडबडीने मंजूर केला होता पाण्याचा विषय असल्यामूळे मंजूर करावा.

श्री.संजय सिरसाट :प्रशासनाला प्रस्ताव देण्याचे सुचित करावे.मी जो प्रस्ताव ठेवला तोही महत्वाचा होता.

मा.महापौर : पाण्याचा विषय आहे, प्रशासनाने ऑलरेडी विषय दिलेला होता. हा विषय मंजूर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सर्वसाधारण सभा दिनांक २३.०६.२००९ रोजी विषय क्र.५०६, नुसार एन- ६ स्मशानभूमी ते सेंट्रल नाका व त्यापूढील भागात ३०० एम.एम.व्यासाची डी.आय.के.-९ जलवाहीनी टाकण्याच्या सुधारीत अंदाजपत्रक चा प्रस्ताव येत्या सर्वसाधारण सभेपूढे फेरनिर्णयासाठी ठेवण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५४६ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, पदमपुरा मामाचौक येथील मनपाच्या पोलला शॉक लागुन कु.संध्या ऊर्फ राणी प्रल्हाद पजई हिचे दिनांक ३०.०६.२००९ रोजी निधन झाले असून त्यांच्या कुटूंबास आर्थिक मदत देण्यासाठी मा.महापौर,मा.आयुक्त,मनपा औरंगाबाद यांना दिनांक ०१.०७.२००९ रोजी निवेदन दिलेले असून तातडीची मदत म्हणून मा.महापौर यांनी ५० हजाराचे धनादेश संबंधीत कुटूंबास तातडीची मदत म्हणून दिलेला आहे.

करीता सदर खर्चास कार्योत्तर मंजूरी देण्यांत यावी, यासाठी प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेत मंजूरीस्तव सादर.

सुचक : श्री.गजानन रामकिशन बारवाल अनुमोदक : श्री.शशांक दामोधर विसपुते

**संवाद :**

श्री.गजानन बारवाल :हा प्रस्ताव मंजूर करावा याच बरोबर मागिल बैठकीत वानखेडेनगर येथील अनिकेत सोनवणे तसेच श्री.संतोष खेंडके यांचे वार्डात

नाल्यामध्ये कु.कुरैशी याचाही मृत्यू झाला त्यांना आर्थीक मदत देण्याचे प्रस्ताव होते स्थगिती दिली होती तेही मंजूर करावे.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर :अशा घटनाच्या प्रकरणात मा.आयुक्तांनी चौकशी करून कार्यवाही करावी असे आयुक्तांना मागिल वेळेस अधिकार दिलेले आहे

श्री.गजानन बारवाल :या दोन-तीन प्रकरणात मा.आयुक्त यांनी चौकशी करावी तसे निवेदने प्रशासनाकडे प्राप्त झालेले आहे विचारविनिमय करून योग्य ते आर्थीक सहकार्य करावे.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर :ठेकेदारानी व्यवस्थीत काम करणार नाही अर्धवट कामे करतात अशा घटना घडतात त्यांचा भुर्दंड महापालिकेला होतो ज्यांनी अर्धवट काम केले त्या ठेकेदारासही दंड आकारणी व्हावी. पैशाने कुणाची मानहाणी भरून निघत नसते.

श्री.गजानन बारवाल :ठेकेदाराकडून इन्श्यूरंन्सचे महापालिका रक्कम घेते ते सुध्दा संबधीत व्यक्तीच्या नातेवाईकांना मिळाले यासाठी प्रयत्न करावे.

श्री.प्रशांत देसरडा :हा विषय मंजूर करण्यास हरकत नाही परंतु शासनाकडून ४ मार्च २००९ रोजी जीआर आलेला आहे त्यांचे स्पष्टीकरण व्हावे.

श्री.गजानन बारवाल :मागिल वेळेस अशोक परांजपे यांना श्रध्दाजंली अर्पण केली रंगमंदिर ते गुरू तेग बहादुर रस्त्याला त्यांचे नाव देण्याचा प्रस्ताव होता तोही मंजूर करावा.

मा.महापौर :हा विषय मंजूर करण्यात येतो. वानखेडेनगर येथील कु.अनिकेत सोनवणे यांचाही शॉक लागून मृत्यू झाला त्यांना मदत देण्या बाबत मागिल बैठकीत प्रस्ताव होता तसेच गारखेडा भागात पाण्याच्या प्रवाहमध्ये कु.कुरैशी नावाच्या मुलाचा मृत्यू झाला यांनाही अशा प्रकारची मदत देण्यात येते.अशा घटना घडू नये याची प्रशासनाने दखल घेतली पाहिजे.मानहाणी झाल्यावर ती भरून निघत नाही.

श्री.सतीष कटकटे :शासनाचे परीपत्रक वाचून दाखवावे.जीआरची माहिती अधिका-यांना असेलच  मदत करण्यात विरोध नाही. वेळीच दखल घेतली असती तर अशा घटना घडल्या नसत्या.

श्री.वसंत नरवडे :लोकांचा मृत्यू होतो आता पोलच्या सर्वेचे काम चालू केले १५ दिवसापासून लाईट बंद आहे. याकडे लक्ष दिले जात नाही.

मा.महापौर :नगरसेवकांची भावना तिव्र भावना आहे हाणी झाल्यानंतर ती भरून निघत नाही. त्या कुटूंबाची अपरीमित हाणी होते.यामूळे शहरातील नागरीक अतिशय त्रासतात.४ मार्च २००९ चे शासन परीपत्रक आहे त्यात असे म्हटले आहे की स्थानिक स्वराज्य संस्थाच्या माध्यमातून नागरीकांकरीता ज्या विविध सोयी सुविध पुरविल्या जातात अशा नागरी सुविधाकरीता मल:निस्सारणाकरीता किंवा पर्जन्य जल व्यवस्थापनासाठी गटाराची बांधकामे,जलवाहिन्या किंवा मलनिस्सारण वाहिन्याची दुरूस्तीची कामे संबधीत संस्था करतात अशा ठिकाणी  मृत्यू सारख्या घटना होतात हे राज्य शासनाच्या निदर्शनास आलेले आहे.या घटना अत्यंत गंभीर आहे.स्थानिक स्वराज्य संस्थेकडून पुरविण्यात आलेल्या मुलभूत सोयी सुविधाची दुरूस्ती करतांना  अपघात होणे प्रसंगी कुणाचा मृत्यू होणे हे अपेक्षीत नाही.अशा घटना घडल्यास संबधीत काम करणा-

या ठेकेदारांस व अभियत्यांस जबाबदार धरून निष्काळीपणाचा गुन्हा दाखल करण्याच्या संदर्भात राज्य शासनाने सुचना दिलेल्या आहेत.अशी कामे करतांना जीवीत हाणी होत असेल तर यास संबंधीत ठेकेदार व संबधीत अधिकारी सुध्दा जबाबदार असू शकतात म्हणून अशा घटना घडणार नाही त्या साठी ज्या ज्या सुचना राज्य शासनाने केल्या त्याचे पालन प्रशासनाने करणे अपेक्षीत आहे नसता नागरीकांच्या रोषाला बळी पडावे लागते. जी मानहानी होते ती मोठी असते याची प्रशासनाने दखल घ्यावी.पदमपूरा येथील राणी पजये तसेच वानखेडेनगर मध्ये एका मुलाचा शॉक लागून मृत्यू झाला त्यावेळी शहरातील संपूर्ण पोलचा सर्वे करण्याचे आदेशीत केले होते त्या सर्व पोलवरील दुरूस्ती करण्याचे आदेशीत केले होते त्यासाठी जो काही खर्च लागेल तो प्रशासनाने करावा.पोलच्या सर्वे संबधीचा रिपोर्ट आला परंतु पुर्ण सर्वे झाला अशी खात्री आजही वाटत नाही.गारखेडा भागातील मुलाचा गटारीमध्ये जाळी नसल्यामूळे मृत्यू झाला अशा घटना होवू नये यासाठी प्रशासनाने दक्षता घ्यावी.योग्य प्रकारे वेळीच कार्यवाही न करणारे ठेकेदार व संबधीत अधिकारी यांना प्रशासनाने जबाबदार धरावे.

श्री.प्रशांत देसरडा दोन महिण्यात विविध घटनामध्ये ०५ लोकांचा मृत्यू झला जे महापालिकेपर्यत येतात त्यांना आर्थीक मदत होते. जळगाव महापालिकेने त्यांचे हद्यीत येत असलेल्या सर्व मतदारांचा इन्श्युरन्स काढला त्यामूळे अपघात,इतर लहान मोठया घटना होतात अशावेळी सर्वांनांच मदत मिळते त्याप्रमाणे औरंगाबाद महापालिका क्षेत्रात असलेल्या नागरीक मतदारांचा इन्श्युरन्स काढता येत असेल तर विचार करावा. १५ लाख खर्च येईल. श्री.गुप्ता साहेब आयुक्त असतांना महानगरपालिका मालमत्तांचे विमा काढण्यांत येत होते.

सौ.पुष्पा शिंदे :पुडंलिकनगर भागात एक मुलगा पाण्यात वाहून मृत्यू झाला आजही एन-३,४ तसेच पुंडलिकनगर भागातून मोठया प्रमाणात पावसाचे पाणी भवानीनगर भागात पसरते पुढे नाला नाही.

श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर : दोन वर्षापासून मागणी आहे.

श्री.काशिनाथ कोकाटे : महापालिका डिमांड करते व नको त्या ठिकाणी विदयुत पोल एमएसईबी बसविते. नियमाने कुठे बसविण्याची गरज आहे याची शहानिशा व्हावी कार्य.अभियंता व विदयुत विभाग जोपर्यत एनओसी देत नाही तोपर्यत पोल बसवू नये.असा नियम करावा शॉक लागणे वगैरे घटना घडणार नाही.स.स.सौ.पुष्पा शिंदे यांचे वार्डात ६-७ वार्डातील पावसाचे पाणी येते ओढया सारखे प्रवाहास स्वरूप आहे. अनेक वेळा बजेट मध्ये नाल्याचे काम करण्यासाठी तरतूद ठेवली अंदाजपत्रक तयार केले परंतु पुढील कार्यवाही केली नाही.हे जाणीवपुर्वक होते अतिवृष्टी झाल्यास ५००-७०० घरांना पाण्याचा फटका बसेल. ही प्रशासनाची जबाबदारी आहे सदर नाल्याचे काम करण्याचे आदेशीत करावे.शासनाच्या परीपत्रकानुसार कार्यवाही करावी जाणीवपुर्वक अधिका-यावर कार्यवाही होवू नये.

श्री.अ.रशिद खान :शॉक लागून मृत्यू झाला असेल जोपर्यत रिपोर्ट दिला जात नाही तोपर्यत पोलीसानी गुन्हा दाखल करणे इललिगल आहे.पोलीसानी मा.आयुक्तांची परवानगी किंवा या सभागृहाचा निर्णय घेतला पाहिजे त्यानंतर ॲक्शन घेतली पाहिजे.

मा.महापौर : मा.आयुक्तांशी चर्चा करून अधिका-यांवर गुन्हा दाखल करायला पाहिजे डायरेक्ट गुन्हा दाखल करणे हे अडचणीचे होईल.

श्री.अ.रशिद खान : गुन्हा दाखल करण्यात येवू नये असे सभागृहाचे मत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार महानगरपालिकेच्या विद्युत खांबाला शॉक लागुन कु.संध्या ऊर्फ राणी प्रल्हाद पजई हीचे निधन झाल्याने त्यांच्या कुटूंबियास मनपातर्फे रू.५०.०० हजार तातडीची आर्थिक मदत देण्यांत आलेली आहे. त्यास कार्योत्तर मान्यता देण्यांत येते. तसेच यापूर्वी वानखेडेनगर येथील विद्युत खांबात विद्युत प्रवाह उतरल्याने चि.अनिकेत संजय सोनवणे या बालकाचा आणि अलीकडेच पुंडलिकनगर प्रभागातील चि.नुर मन्सुर कुरैशी या बालकाचे पावसाच्या पाण्यात वाहून निधन झाल्याने त्याचे कुटूंबियास शासन निर्णयाप्रमाणे प्रत्येकी रू.५०.०० हजार महापालिकेतर्फे आर्थिक मदत करणेच्या दुरूस्तीसह सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**चर्चा :**

श्री.शशांक विसपुते :माझे वार्डात डीपी रोडचे काम चालू असून साईडला नाल्या करण्यासाठी खोदकाम करून ठेवले एक वर्षापासून काम बंद आहे पावसाळयात पाण्याचा प्रवाह वसाहतीत येतो.परवा अशीच परिस्थिती निर्माण झाली` संबधीत ठेकेदार काम का करीत नाही.काळया यादीत समावेश करू असे म्हटले परंतु सदर संचिका मिळत नाही.सदर ठिकाणी प्रशासन व आपण पाहणी करावी.रस्ता तोडावा लागला लोकांच्या घरामध्ये पाणी गेले ठेकेदारास वाचविण्याचा प्रयत्न होतो. संबधीतावर कडक कार्यवाही व्हावी. रस्ता आहे का,खड्डा आहे कळत नाही. त्वरीत कार्यवाही करावी.

मा.महापौर :स.सौ.पुष्पाताई शिंदे यांचे वार्डातील जे नाल्याचे काम करणे आहे ते त्वरीत सुरू करण्यात यावे.पावसाच्या पाण्यामूळे लोकांना त्रास होणार नाही याची प्रशासनाने दखल घ्यावी.तसेच स.श्री.शशांक विसपुते यांचे वार्डातील रस्त्याच्या कडेला त्यांनी आताच म्हटल्याप्रमाणे त्या ठिकाणचे काम त्वरीत करण्यात यावे.कोणत्याही कामाची संचिका गहाळ होणे ही गंभीर स्वरूपाची बाब आहे याची प्रशासनाने दखल घ्यावी.

## ऐनवेळचे विषय

**विषय क्र. ५४७ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, दिनांक २३.०६.०९ रोजी संपन्न झालेल्या मा.सर्वसाधारण सभेसमोर औरंगाबाद पाणी पुरवठा योजने अंतर्गत ढोरकीन पंपगृह येथील पंपासाठी नविन ३५० अ.श.च्या मोटर्स खरेदीचा रक्कम रूपये ५४,२५,१७०/- चा प्रस्ताव सादर करण्यात आलेला होता, या प्रस्तावावर चर्चा झाली. त्यात समांतर पाणी पुरवठा योजनेस शासनाने मान्यता दिलेली असल्यामूळे योजनेची उभारणी होवून जास्तीचे पाणी मिळणार आहे. समांतर पाणी पुरवठा योजना कार्यान्वित झाल्यानंतर सध्याची ५६ MLD योजना बंद करण्याचे

नियोजन आहे. अशा स्थितीत नविन मोटर्स खरेदी न करता त्याच मोटर्स दुरूस्त करून चालविण्या बाबत निर्णय घेण्यात आलेला आहे.

ढोरकीन पंपगृह येथे एकूण सहा मोटर/पंप संच १९८५ मध्ये बसविण्यात आलेले होते. या पंपांची कार्यक्षमता कमी झाल्यामूळे येथील सर्व सहा पंप २००५ मध्ये बदलण्यात आलेले आहेत. परंतू त्यावेळी निधी अभावी या पंपा सोबतच्या मोटर्स बदलता आलेल्या नाहीत. या सहाही मोटर्सची कार्यक्षमता दिवसेंदिवस कमी होत आहे. मोटरच्या कार्यक्षमतेची तपासणी केली असता ८८.५% असल्याचे दिसून आले आहे. नविन मोटर्सची कार्यक्षमता सर्वसाधारणपणे ९४% असते. याचाच अर्थ जून्या मोटर्सची कार्यक्षमता ५.५% ने कमी झालेली आहे.

मोटर्सची कार्यक्षमता विचारात घेवून गणिते करण्यात आली. ढोरकीन पंपगृहासाठी दरमहा सर्वसाधारणपणे रूपये २०.७२ लक्ष विज देयकावर खर्च होतो. नविन मोटर्स बसविल्यास @ ५.५% ने या खर्चात बचत होवू शकते. यावरून नविन मोटर्स बसविल्यास सर्वसाधारणपणे चार वर्षात झालेला खर्च भरून येईल.विज देयकातील बचती शिवाय नविन मोटर्समूळे खालील प्रमाणे फायदा होवू शकतो.

०१. मोटर्स दुरूस्तीवर वारंवार होणारा खर्च टाळता येईल.

०२. मोटर्सच्या Vibration मूळे पंपावर ही परिणाम होतो, नविन मोटर्समूळे पंप नादुरूस्त होण्याचे प्रमाण कमी होईल.

०३. जास्तीच्या करंटमूळे या मोटर्सशी संलग्न असलेली उपकरणे जसे स्टार्टर,केबल, A.C.B. इत्यादी यांचेवर विपरीत परिणाम होतो. नविन मोटर्समूळे तो टाळता येईल.

०४. पाणी पुरवठा अखंड/नियमित करण्यास मदत होईल.

०५. नविन मोटर्समूळे पंपाच्या पाणी उचल क्षमतेत काही प्रमाणात वाढ करता येईल.

वरील सर्व बाबी लक्षात घेता नविन मोटर्स बसविल्यास विजेच्या खर्चात बचत होणार आहे. तसेच ढोरकीन येथे मोटार्स बसविण्याचा एकूण अंदाजपत्रकीय खर्च रक्कम रूपये ५४,२५,१७०/- हा बाराव्या वित्त आयोगांतर्गत प्राप्त रू.५.६० कोटी अनुदानातून करण्यात येणार आहे. त्यास्तव या कामासाठी रूपये ५५ लक्षची तरतूद ठेवण्यात आलेली आहे.

तरी ३५० अ.श.क्षमतेच्या सहा मोटर्स खरेदीसाठी अंदाजपत्रक रक्कम रू.५४,२५,१७०/- चा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या पुनर्विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

श्री.गजानन बारवाल :महत्वाचा विषय आहे मंजूर करण्यात यावे.

मा.महापौर :हा विषय मंजूर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद पाणी पुरवठा योजने अंतर्गत ढोरकीन पंपगृह येथील पंपासाठी नविन ३५० अ.श.च्या मोटर्स खरेदीच्या रक्कम रूपये ५४,२५,१७०/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५४८ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, औरंगाबाद शहरामधील क्रांतीचौक येथे वाहतुक सुरळीत व्हावी व शहरातील नागरीकांना रहदारीचा त्रास कमी व्हावा या करीता उड्डाण पुलाचे बांधकाम महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांच्या मार्फत प्रस्तावित असून उड्डाणपुलाचे काम अधिक गतीने होणे कारीता कोटला पाण्याची टाकी ते शासकीय दुध डेअरी क्रांतीचौक या विकास योजने अंतर्गत ४५.०० मीटर रूंद रस्त्याने बाधीत शासकीय,निमशासकीय,खाजगी मालमत्ता भूसंपादीत करणे आवश्यक आहे. याबाबत संबंधीत मिळकत धारकांना यापूर्वी भूसंपादनाची प्रक्रीया म्हणून कार्यवाही सुरू करण्यात आली आहे. उक्त रस्त्याने बाधीत सर्व

मिळकत धारकांना बाधीत जागेचा मावेजा नियमावली मधील तरतुदी प्रमाणे चटई क्षेत्र निर्देशांक स्वरूपात,विकास हक्क हस्तांतरण (T.D.R.) रोख रक्कम स्वरूपात देणे आहे. या उड्डाणपुलाचे लगतचे रस्त्याचे (Slip Road) काम सुरू असून त्यापैकी क्रांतीचौकाचे पश्चिमेकडील दोन्ही बाजूचे रूंदीकरणाचे काम पूर्ण होत आले आहे. सदर रूंदीकरणात ज्या भूखंडधारकांचे मालमत्ता बाधीत होतात त्यांनी पूर्ण सहकार्य करून रस्ता बांधणीस जागा उपलब्ध करून दिली आहे.

मात्र नगर भूमापन क्रमांक १७३६४ चे भूखंडधारकांनी खाजगी वाटाघाटीने देय टि.डी.आर. किंवा एफ.एस.आय. घेण्यास नकार दिला असून देयक पेक्षा जास्त मागणी केली आहे. जी की,नियमानुसार मान्य करता येत नाही. सदर भूखंडाचे बाधीत क्षेत्र संपादीत करणे उड्डाणपुलाचे बांधकाम पूर्ण करण्यासाठी आवश्यक आहे. त्यामूळे सदर भूखंडाचे भूसंपादन हे भूसंपादन कायद्या अंतर्गत करण्यासाठी प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांच्याकडे पाठविणे आवश्यक आहे. ४५.०० मिटर रूंद विकास योजना रस्त्याने या भूखंडाचे साधारणत: ३२४.०० चौ.मी. एवढे क्षेत्र बाधीत होते. तरी सदर क्षेत्र भूसंपादन करण्यासाठी प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांच्याकडे पाठविण्याचा प्रस्ताव त्यास येणाऱ्या खर्चासह मान्यतेस्तव सादर.

**<u>संवाद :</u>**

| | |
|---|---|
| श्री.गजानन बारवाल | :हे काम करणे जरूरी असल्यामूळे प्रस्ताव मंजूर करण्यास हरकत नाही. |
| श्री.संजय सिरसाट | :रस्ता महापालिकेचा की सार्वजनिक बांधकाम विभागाचा आहे. |
| श्री.गजानन बारवाल | :जर हा प्रस्ताव दोन दिवसापूर्वी आपल्याकडे आला असेल तर त्यांची माहिती ०५ पदाधिकारी यांना दयायला पाहिजे होती. |
| मा.महापौर | : सभागृहात आल्यानंतर प्रस्ताव आलेला आहे. |
| कार्य.अभियंता-ई व फ | : सदर रस्ता हा महानगरपालिकेचा आहे. |
| मा.महापौर | : प्रस्ताव मंजूर करण्यात येतो. |

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद शहरामधील क्रांतीचौक येथे वाहतुक सुरळीत व्हावी व शहरातील नागरीकांना रहदारीचा त्रास कमी व्हावा या करीता उड्डाण पुलाचे बांधकाम महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांच्या मार्फत प्रस्तावित असून उड्डाणपुलाचे काम अधिक गतीने होणे कारीता कोटला पाण्याची टाकी ते शासकीय दुध डेअरी क्रांतीचौक या विकास योजने अंतर्गत ४५.०० मीटर रूंद रस्त्याने बाधीत नगर भूमापन क्रमांक १७३६४ चे भूखंडधारकांनी खाजगी वाटाघाटीने देय टि.डी.आर. किंवा एफ.एस.आय. घेण्यास नकार दिला असल्यामूळे, व देयक पेक्षा जास्त मागणी केली असल्यामूळे,नियमानुसार मान्य करता येत नसून सदर भूखंडाचे बाधीत क्षेत्र संपादीत करणे उड्डाणपुलाचे बांधकाम पूर्ण करण्यासाठी आवश्यक असल्यामूळे, सदर भूखंडाचे भूसंपादन हे भूसंपादन कायद्या अंतर्गत करण्यासाठी प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांच्याकडे पाठविणेस व भूसंपादनास येणाऱ्या खर्चासह सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>चर्चा :</u>**

| | |
|---|---|
| मा.महापौर | :स्थायी समितीकडून काही प्रस्ताव आलेले आहे. |
| श्री.संजय सिरसाट | :बजेट ठेवत नाही ऐनवेळी स्थायी समितीकडील प्रस्ताव घेवू नये. |
| श्री.गजानन बारवाल | :स्थायी समिती बजेट सादर करीत नाही तोपर्यत प्रस्ताव घेवू नये. |
| श्री.संजय सिरसाट | :ऐनवेळी आले त्यावर चर्चा व्हावी सभागृहात सदस्य संख्याही कमी आहे. पूढील सभेत घ्यावेत. |
| मा.महापौर | :स्थायी समितीचे प्रस्ताव हे प्रशासनाकडून आलेले आहे. |

श्री.संजय सिरसाट : प्रस्ताव आता घेवू नये. नगरसेवकांचे प्रस्ताव ही महत्वाचे असतात त्यावर निर्णय होत नाही. पुढील सभेत घेण्यात यावे.ऐनवेळेचे जेवढे विषय असतील त्याची प्रत दयावी त्यावर चर्चा करणार आहोत.

मा.महापौर :स्थायी समितीकडील प्रस्ताव पुढीलसभेत विषयपत्रिकेवर घेण्यात येईल.

श्री.वसंत नरवडे :ऐनवेळी कुठलाही प्रस्ताव घेवू नये असा ठाम निर्णय घ्यावा विरोध करतात त्यांना जनतेसमोर दाखवावे.

श्री.संजय सिरसाट :ड्रम प्रोजेक्टचा विषय सुध्दा महत्वाचा होता त्यास स्थगिती दिली मान्यता देण्याची चर्चा होते आपले रूलीग वेगळे होते.

श्री.वसंत नरवडे :ड्रम प्रोजेक्टचा विषय प्रशासकीय यायला पाहिजे होता.

मा.महापौर :प्रशासनाकडील प्रस्ताव घ्यावे लागतील हा नियम आहे. तरी सुध्दा आपल्या सुचनेनुसार पुढील बैठकीत घेण्याचा निर्णय दिला आहे.

**<u>विषय क्र. ५४९ :</u>**

आयुक्त,महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहेत की, महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्र.सीएलएस-०६-०४/प्रक्र १६८/म-३,मंत्रालय, मुंबई- दि.१९.०८.२००४, अन्वये राज्यात उद्भवलेल्या नैसर्गिक आपत्तीमध्ये मृत पावलेल्या व्यक्तींच्या वारसांना मदतीचे सुधारीत दर मंजूर केलेले आहेत व त्यानुसार शासनातर्फे राज्यातील नागरीकांना मदत करण्यात येते. अशा प्रकारच्या अनेक दुर्दैवी घटना महानगरपालिका हद्दीत, महानगरपालिकेच्या मालमत्तेपासूनही जिवित हानी उद्भवते त्यासाठी औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रात नैसर्गिक आपत्तीमध्ये मृत पावलेल्या व्यक्तींना मदत देण्यात यावी म्हणून वेळोवेळी सभेसमोर प्रस्ताव मंजूरीस्तव येत असतात. याबाबत कायमचे धोरण निश्चित व्हावे असा विचार समोर आल्यानुसार आणि औरंगाबाद महानगरपालिकेच्या आर्थिक स्थितीचा विचार करता नैसर्गिक आपत्ती आणि महानगरपालिकेच्या मालमत्तापासून झालेल्या मृत व्यक्तीच्या वारसास खालील प्रमाणे आर्थिक सहाय्य करणे बाबतचा प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव मा.सर्वसाधारण सभेसमोर सादर करण्यात येत आहे.

| **मृत व्यक्ती** | **मदत रक्कम** |
|---|---|
| **०१ ते ६५ वयोगट** | **रू.५०,०००/-** |

**<u>संवाद :</u>**

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर: ज्यांना मदत देणार त्यांची नावे सुध्दा सभागृहासमोर यायला पाहिजे.

मा.महापौर :आतापर्यत ज्यांना आर्थीक मदत दिली त्यांची नावे पुढील बैठकीत सादर करावी. हा प्रस्ताव मंजूर केला असला तरी याच बरोबर शहरातील जे नागरीक मतदार आहे त्यांचेसाठी इन्श्युरन्स करता येतो का हे प्रशासनाने बघावे.

श्री.अ.रशिद खान :५० हजार कोणती घटना घडल्यानंतर देणार याचाही खुलासा करावा.

मा.महापौर :शासन नियमाला अधिन राहून या बाबतीत कार्यवाही होईल.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर :विद्यापीठ सलग्न जे कॉलेज आहेत तेथील विदयार्थ्याचा इन्श्युरन्स काढला जातो.शहरातील नागरीकाचा काढल्यास योग्यच आहे.

श्री.गजानन बारवाल :शाळेच्या विदयार्थ्याचा इन्श्युरन्स काढले होते ते बंद झाले.त्याचा सुध्दा विचार करावा.

मा.महापौर :शाळेच्या विदयार्थ्याचे इन्श्युरन्स काढले होते ते सध्या बंद आहे ते चालू करण्या बाबत कार्यवाही करता येईल का हे प्रशासनाने बघावे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,महाराष्ट्र शासन,महसूल व वन विभाग,शासन निर्णय क्र. सीएलएस-०६-०४/प्रक्र१६८/म-३,मंत्रालय,मुंबई-दि.१९.०८.२००४,अन्वये राज्यात उद्‌भवलेल्या नैसर्गिक आपत्तीमध्ये मृत पावलेल्या व्यक्तींच्या वारसांना मदतीचे सुधारीत दर मंजूर केलेले आहेत व त्यानुसार शासनातर्फे राज्यातील नागरीकांना मदत करण्यात येते. अशा प्रकारच्या अनेक दुर्दैवी घटना महानगरपालिका हद्दीत, महानगरपालिकेच्या मालमत्तेपासूनही जिवित हानी उद्‌भवते त्यासाठी औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रात नैसर्गिक आपत्तीमध्ये मृत पावलेल्या व्यक्तींना मदत देण्यात यावी म्हणून आणि औरंगाबाद महानगरपालिकेच्या आर्थिक स्थितीचा विचार करता नैसर्गिक आपत्ती आणि महानगरपालिकेच्या मालमत्तापासून झालेल्या मृत व्यक्तीच्या वारसास खालील प्रमाणे आर्थिक सहाय्य करणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

| **मृत व्यक्ती** | **मदत रक्कम** |
| --- | --- |
| **०१ ते ६५ वयोगट** | **रू.५०,०००/-** |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

या नंतर राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा.महापौर यांनी घोषित केले.

**नगर सचिव,**
महानगरपालिका औरंगाबाद.